## ३ शीलव्रतेष्वनतिचार

आता तिसरी शीलव्रतेष्वनतिचार भावना सांगतात. शीलव्रतेष्वनविचार ह्याचा अर्थ वार्तिकात असा सांगितला आहे की, अहिंसादिक पाच व्रते आणि ही व्रते पाळण्यासाठी क्रोधादि कषायांचा त्याग करण्याची शील म्हणजे मन, वचन कायेची जी निर्दोष प्रवृत्ती तिला शीलव्रतेष्वनतिचार भावना म्हणतात. शील म्हणजे आत्म्याचा स्वभाव. या आत्मस्वभावाचा नाश करणारी हिंसादिक पाच पातके आहेत. त्यात कामसेवन म्हणून जे एक पाप आहे ते हिंसादिक सर्व पापांना वढ विणारे आणि क्रोधादिक कषाय वाढ विणारे आहे, म्हणून येथे ब्रह्मचर्याची प्रधानता समजून वर्णन केले आहे.

शील दुर्गतीच्या दु:खाचे हरण करणारे आहे. स्वर्गादिक शुभगतीला कारक आहे. तप, व्रत, संयम ह्यांचा प्राण आहे. शीलावाचून तप करणे, व्रत धारण करणे, संयम पाळणे हे सगळे प्रेताच्या अंगासारखे त्याज्य आहे. शीलरहित असणाऱ्यचे तप, व्रत, संयम ही सगळी धर्माची निंदा करविणारी आहेत, म्हणून शील धर्माचे अंग समजून ते अवश्य पाळले पाहिजे. ह्या चंचल मनरूप पक्षयाला शील व्रतरूप स्तंभाला बांधून ठेवा. आपले शील निर्दोष करून त्याला पुष्ट करा.

धर्मरूप बागेचा विध्वंस करणाऱ्या मनरूप मदोन्मतत हत्तीला रोका. भटकलेला मनरू प हत्ती महान् अनर्थ करतो, उन्मत्त होतो, तेव्हा तो आपली बंधने तोडून पळून जातो, तसा मनरू पी हत्ती कामविकाराने उन्मत्त झाला म्हणजे साम्यभावरू प स्वरू पातून निघून पळू लागतो. त्याला तोून जातो आणि मनरू पी हत्ती हा सद्‌बुद्धिरू पी साखळी तोडून फिरू  लागतो. हत्ती हा महंताला पाडून टाकतो. कामांधाचे मन सम्यग्धर्माच्या मार्गात प्रवर्तविणाऱ्या ज्ञानाला टाकून देते. हत्ती अंकुशाला मोजीत नाही आणि मनरू पी हत्ती हा गुरू चे शिक्षाकारी वचन मानीत नाही. हत्ती हा छायावान आणि फलद्रूप अशा वृक्षाला उपटून टाकतो आणि कामविकाराने व्याप्त झालेले मन हे स्वर्गमोक्षरू पी फळ देणारा, यशरू पी सुगंध पसरविणारा व संपूर्ण विषयांचा ताप नाहीसा करणारा असा ब्रह्मचर्यरू पी वृक्ष उपटून टाकते. हत्ती सरोवरात स्नान करू न पुन: मस्तकावर धून टाकून मातीशी खेळतो आणि कामविकाराने व्याप्त झालेले मन सिद्धांतरू प सरोवरामध्ये फिरू न अज्ञानरू पी मळ धुऊन पुन: पापरू पी मातीत लोळू लागतो. हत्ती आपले कान नेहमी हलवीत असतो आणि कामसंयुक्त मन हे पाचही इंद्रियांच्या विषयामुळेचंचल झालेलेअसते. हत्ती हा हत्तिणीशी रममाण होतो आणि कामसंयुक्त मन हे कुबुद्धिरू पी हत्तिणीत रंजित होते. हत्ती हा स्वच्छंदपणेडुलत असतो. कामसंयुक्त मनही स्वच्छंदी होऊन जाते. हत्ती हा मदाने मत्त होतो आणि कामी पुरुषाचे मन रू पादिक आठ मदांनी उन्मत्त होतो. उन्मत्त हत्तीच्या जवळ कोणी ये नाही. कामविकाराने उन्मत्त झालेल्या माणसाजवळ कोणताही गुण

नसतो. यास्तव कामविकाराने उन्मत्त झालेल्या मनरू पी हत्तीला वैराग्यारू पी खांबाला बांधा. ते मोकळे राहिल्याने फार अनर्थ करील.

कामाला अनंग म्हणतात, म्हणजे त्याला अंग नाही. कामाला मनसिज म्हणतात, म्हणजे मनामध्येच ह्याचा जन्म आहे. कामाला मन्मथ म्हणतात, म्हणजे हा मनातील ज्ञानाचे मंथन करणारा आहे. तसेच हा संवराचा अरि म्हणजे वैरी आहे म्हणून यास संवरारि म्हणतात. कामापासून खोटा गर्व उत्पन्न होतो म्हणून त्याला कंदर्प म्हणतात. ह्याच्या योगाने अनेक मनुष्य व तिर्यंच परस्परात भांडून मरतात म्हणून ह्याला मार म्हणतात. मनष्याच्या अन्य इंद्रियांनी विषयभोग उघडपणे घेता येतात. परंतु कामसेवनाची इंद्रिये झाकलेली आहेत. कामविषयाच्या इंद्रियाचे नाव सुद्धा सभ्य पुरुष आणि सभ्य स्त्रिया उच्चारीत नाहीत. कामविकार हा धर्मापासून भ्रष्ट करणारा आहे. ह्यासारखे दुसरे पाप नाही. ह्या कामविकाराने हरिहरब्रह्मादिकांना भ्रष्ट करू न आपल्या स्वाधीन करू न घेतले आहे. ह्यावरू न सगळ्या जगाला जिंकणारा एक कामच आहे. कामाला जो जिंकील तो मोहाला सहज जिंकील.

कामविकार नाहीसा करण्यासठी मनुष्य, स्त्री, देवांगना आणि तिर्यंचिणी यांचा संबंध ठेवू नका. ह्यांच्या सोबतीत बसू नका. स्त्रियाविषयींची आवड सोडून द्या. आपण कुशलमार्गाने वागू नका दुसऱ्याला कुशीलमार्गाचा उपदेश देऊ नका. इतर कोणी कुशीलमार्गाने वागत असल्यास त्याला अनुमोदन देऊ नका. लहान मुलीला पाहाल त्यावेळी ही आपली मुलगी आहे अस मनात आणा. तरू ण स्त्रीला पाहाल त्यावेळी ती आपली बहीण आहे असे मनात वागवा. तिच्याशी बोलणे चालणे विशेष ठेवू नका. जे शीलवान आहेत त्यांची दृष्टी स्त्रियाकडे गेल्या बरोबर मिटून जाते. जो स्त्रियांशी अधिक बोलणे चालणे ठेवील, स्त्रियांच्या अंगाकडे पाहात राहील त्याचा शीलभंग होण्याचा संभव आहे. ह्यासाठी गृहस्थाने आपल्या स्त्रिशिवाय अन्य स्त्रीची सोबत वर्ज्य करावी. अन्य स्त्रियांचया गोष्टीत मन घालू नये. आपली आई, बहीण किंवा मुलगी जरी असली तरी तिच्याशी एकांत जागी बोलत बसू नये. मुनी तर स्त्रियांशी संबंधच ठेवीत नाहीत. स्त्रियांमध्ये बसून उपदेश करीत नाहीत. स्त्रीची नावेच दोषदर्शक आहेत. स्त्रीला नारी म्हणतात. म्हणजे स्त्रीसारखि अरि म्हणजे वैरी दुसरा नाही म्हणून हिचे नाव नाही पडले आहे. दोषांना प्रत्यक्ष पाहता पाहता झाकून टाकते म्हणून तिला स्त्री म्हणतात. हिला पाहिल्या बरोबर पुरुषाचे पतन होते म्हणून हिला पत्नी म्हणतात. कुमरण करण्याला ही कारण आहे म्हणून हिला कुमारी म्हणतात. हिच्या संगतीने पुरुषाची बुद्धी आणि बलादिक नाहीसे होतात म्हणून हिला अबला म्णता. संसाराच्या बंधाला कारण आहे म्हणून हिला वधू म्हणतात. कुटिलत (मायाचारी स्वभाव) धारण करते म्हणून हिला वामा म्हणता. हिच्या डोळ्यात कुटिलता आहे म्हणून हिला वामलोचना म्हणतात. हिची नांवे सगळी दोषदर्शकच आहेत.

शीलवान परुषाला इंद्र देखील नमस्कार करतात. शीलवान पुरुष रत्नत्रयरू पी धन घेऊन कामादिक लुटारू च्या भयापासून रहित होऊन निर्यपणे निर्वाणपुरीला गमन करतात, शीलाने भूषित असा पुरुष कुरू प असला, मलिन असला, रोगग्रसित असला तथापि तो आपल्या शीलगुणाने संपूर्ण सभाजनाला मोहित करतो, सुखी करतो आणि शीलरहित जो व्यभिचारी आहे तो कामदेवासारखा स्वरू पवान असला तथापि लोक त्याची छी थूं करतात. कारण ह्याचे नावच कुशील आहे. शील हे नांव स्वभावचे आहे. आत्म्याचा स्वभाव जो ब्रह्मचर्य तो कामी पुरुषाने भ्रष्ट केल्यामुळे त्याला कुशील म्हणावे लागते. कामी मनुष्य धर्मापासून, आत्म्याचा सवभावापासून व व्यवहाराच्या शुदधीपासून चलायमान होतो. म्हणून ह्याला व्यभिचारी म्हणतात. ह्यासारखे जगामध्ये अन्य कुकर्म नाही, म्हणून कामाला कुकर्म म्हणतात. कामविकाराने मनुष्य पशूसारखा होतो म्हणून ह्याला पशुकर्म म्हणतात. ब्रह्म जो आत्मा त्याच्या ज्ञानदर्शनादि स्वभावाचा घात ह्यापासून होतो म्हणून अब्रह्म म्हणतात. कुशीलेच्या संगतीने कुशील होतो. ज्याने शील पाळले त्यानेचक्षमा, तप, व्रत, संयम हे वचने पाळले. आपल्या स्वभावापासून चलायमान न होणेह्याला मुनीश्वर शील म्हणतात. शील नावाचा गुण सगळ्या गुणात मोठा आहे. शीलवान पुरुषाचे थोडेसे तप फार मोठे फलदायक होते. शीलाशिवाय पुषकळसे तप निष्फल आहे. ह्याप्रमाणे आत्म्याचे शील शुद्ध होण्यासाठी शीलाचे नित्य पूजन करा. हे शीलव्रत मनुष्यजन्मातच पाळता येण्यासारखे आहे, अन्य गतीत नाही. ह्यासाठी मनुष्यजन्म सफल व्हावा असे इच्छीत असला तर शीलाचीच कास धरा. याप्राणे शीलव्रतेष्वनतिचार नावाच्या तिसऱ्या भावनेचे वर्ण केल.

## ४ अभीक्ष्णज्ञानोपयोग

आता अभीक्ष्णज्ञानोपयोग नावाच्या चौथ्या भावनेचे वर्ण करतात.

हे आत्मन्, मनुष्यजनम प्राप्त झाला आहे त्याअर्थी निरंतर ज्ञानाभ्यासात वेळ घालव. ज्ञानाभ्यासावाचून एकक्षण देखील जाऊ देऊ नकोस. ज्ञानाभ्यासाशिवाय मनुष्य पशूसारखा आहे. म्हणून यथाकाल जिनागमाचा पाठ करीत जा. साम्यभाव झाल्यावेळी ध्यान करीत जा आणि शास्त्राच्या अर्थाचे चिंतन करीत जा. ज्ञानी गुरुजनांची नम्रतेने वंदना करीत जा. धर्मश्रवण करण्यास इच्छितील त्यास धर्माचा उपदेश कर. याप्रमाणे आपला सर्व वेळ ज्ञान देण्यात व घेण्यात घालविणे यास अभीक्ष्णज्ञानोपयोग म्हटले आहे. या सर्व गुणांचे अष्टद्रव्यांनी पूजन करू न अर्ध्य उतरा व पुष्पांची ओंजळ भरू न पुढ ह्या भागी क्षेपण करा. ज्ञानोपयोग हा अनादि कालापासून काम, क्रोध, अभिमान, लोभादिकांचा संस्कार माझ्या चैतन्यस्वरू पात घुसला आहे. तो सर्वज्ञ प्रभूच्या प र मागमाच्या प्रभावाने नाहीसा होऊन मी आपल्या ज्ञायकस्वभावस्वरू पामध्ये स्थिर व्हावे आणि रागादिक विकारांच्या स्वाधीन होऊ नये ह्यातच माझे हित आहे, अशी माझी मनोवृत्ती व्हावी. नवीन शिष्यपुढे श्रुताचा अर्थ असा सांगावा की, त्यापासून त्याचे संशय दूर होऊन अंत:करणात स्वपर-पदार्थाचे यथावत स्वरू प प्रकट व्हवे. पाप-पुण्याचे, लोक-अलोकाचे आणि मुनिधर्म व श्रावकधर्माचे यथार्थ स्वरू प

त्यांना समजले जावे. आपण अंत:करणात संसारदेहभोगापासून विरक्त होण्याचे चिंतन करावे. संसारदेहभोगांच्या यथार्थ स्वरू पाचे चिंतन केल्यापासून राग, दवेष आणि मोह हे आपल्या ज्ञानाला विपरीत करू शकत नाही. इतर द्रव्याशी आत्मा एकरू प झालेला आहे तरी त्याला भिन्न अनुभविणे हाच ज्ञानोपयोग आहे. ज्ञानाभ्यास केल्याने विषयावरील इच्छा नाहीशी होते, कषायाचा अभाव होतो, माया, मिथ्या आणि निदान ही तीन शल्ये नाहीशी होतात, मन स्थिर होते, अनेक प्रकारच वकल्प नाहीसे होतात, धर्मध्यान, शुक्लध्यानात मन अचल राहते, व्रतसंयमापासून मन चलायमना होत नाी जनेंद्रची शासन- परंपरा चालू राहते, अशुभ कर्मांचा नाश होतो, जिनधर्माची प्रभावना होते व लोकांच्या ह्रदयात साचलेले पापरू पी ऋण नाहीसे होते. अज्ञानी जीव घोर तपश्चरण करू न कोट्यावधि वर्षात जी कर्मे नाहीशी करतो ती कर्मे ज्ञानी जीव अंतर्मुहूर्तात नाहीशी करतो. जिवधर्माचा आधारस्तंभ म्हणजे ज्ञानाभ्यासच होय. ज्ञानाच्या प्रभावाने संपूर्ण विषयावरील वांछा नाहीशी होऊन संतोष प्राप्त होतो. ज्ञानाने उत्तमक्षमादिक गुण प्रकट होतात. ज्ञानाभ्यासापासूनच भक्षय, अभक्षय, योग्य, अयोग्य, त्याज्य, ग्राह्य, इत्यादि विचार सुचतात. ज्ञानाशिवाय परमार्थ आणि व्यवहार यातून एकही साधत नाी. ज्ञानरहित राजपुत्राचा निरादर होतो आणि ज्ञानवान अशा गरीब माणसचा सतकार होतो. ज्ञानासारखे कोणतेही धन नाही. ज्ञानदानासारखे दुसरे दान नाही. दु:खी आणि सुखी प्राण्याला ज्ञान हे नेहमी सहाय्य देते. ज्ञान हच स्वदेशा आणि परदेशात आदर मिळवून देते. ज्ञानधन चोरले जात नाही. कोणाला दलयाने कमी होत नाही. ज्ञानच सम्यग्दर्शन उत्पन्न करते. ज्ञानापासून मोक्षप्राप्त होतो. सम्यग्ज्ञान हे आत्म्याचे स्वाधीन आणि अविनाशी धन आहे. ज्ञानावाचून संसारसमुद्रात बुडणाऱ्या हात देऊन काढण्यास दुसरा कण समर्थ आहे( विद्येसारखे भूषण नाी. वदयवाचून नुसत्य वस्त्रालंरानी शृंगारलेल्या पुरुषाचा लो गौरव करीत नाहीत. निर्धनाल परमनिधान प्राप्त करू न देणारे एक ज्ञानच आहे म्हणून हा भव्य जवहो, भगवान् करुणानिधान वीतराग गुरु तुम्हाला असा उपदश करता की आपल्या आत्म्याला सम्ज्ञानाच्य अभयासातच गुंतवा व मिथ्याज्ञानाच तयाग करा. सम्यक कोणते आणि मिथ्या कोणते ह्याची परीक्षा करू न ग्रहण करा आपलय मुलाला शिक्षण द्या, इतरांनाही वदयच अभ्यास करवा तम्ही धनवान असाल व आपलय द्रवयच सन्मार्गी खर्च व्हावा अशी तुमची इच्छा असेल तर, जे विद्या शिकणारे आणि विद्या शिकविणारे असतील त्यंच्य अन्नवस्त्रांची सोय करू न द्या त्यंचे लक्षण विदया शिकण्यात राहील असे करा, तयांना पुस्तके दया. पुस्तके शुद्ध करा व शुद्ध करवा. विदया शिकण्यासाठी जागेच्या सोयी करू न द्या. निरंतर पठन -पाठन करण्यात काळ घालवा. क्षणोक्षणी आयुष्य कमी होत आहे. जोपर्यंत आयुष्य, इंद्रिये, शरीर, बुद्धी ही कायम आहेत, तोपर्यंत मनुष्यजन्माची एक घटका देखील सम्यग्ज्ञान-संपादनाशिाय जाऊ देऊ नकोस. हे ज्ञानरू पी धन परलोकी बरोबर येईल. ह्या अभीक्षणज्ञानोपयोगाचा महिमा कोटिजिव्हांनी देखी वर्णन करता येत नाी. यास्तव गृहसथांनी ज्ञानोपयोगाला परम शरण होऊन अर्ध्य उतरावा आणि गृहत्यगींनी यच निरंतर चंतन करावे. अशी रीतीने अभीक्षणज्ञानोपयोग नावाच्या चौथ्या भावनेच वर्ण कले.

## ५ संवेगभावना

आता पाचव्या संवेगभावनेचे वर्ण करतात.

संसारदेहभोगापासून विरक्ती होणे त्याला संवेग म्हणतात. तसेच धर्म आणइ धर्माच्या फळामध्ये प्रीती करणे ह्यालाही संवेग म्हणतात. संसारात ज्या पुत्रावर आपण प्रीती करतो तो पुत्र जन्मताच स्त्रीचे तारुण्य व संदर्यादिक नाहीसे करतो, मोठ्या मेहनतीने आणि थाटाने पुष्कळ पैसे खर्च करू न त्याचा आपण जन्मोत्सव करतो. त्याला काही इजा होऊ नये म्हणून काळजीने त्याचा सांभाळ करतो. मोठा झाल्यावर त्याला चांगले खावयाला, उंची वस्त्रे नेसावयाला, मौल्यवान दागिने घालावयाला, चांगली जागा राहावयाला देतो. इतके करू न तो जर मूर्ख किंवा व्यसनी निघाला तर त्याच्यापासून आपणाला रात्रंदिवस जे दु:ख होते ते सांगता येत नाही. तो कर्ता निघून आपले ऐकेनासे झाला म्हणजे आपल्या दु:खाला पारावार राहात नाही. पुत्राच्या मोहाने परिग्रहावरील मूर्च्छा वाढ त जाते. आपण जीवंत असताना पुत्र मरण पावला तर जन्मभर त्याची आठवण करू न आपण रडत बसतो. आपण काम करीत आहोत तोपर्यंत तो आपणावर प्रीती करतो. आपण थकलो असे जेव्हा तो पाहतो तेव्हा तो आपणावर प्रीती करत नाही. आपणापाशी पैसे नसले म्हणजे आपला निरादर करू  लागत. पुत्रसुखाची अशी अवस्था समजून त्याविषयी प्रीती कमी करू न धर्मावर प्रीती करावी. पुत्रासाठी अन्यायाने धन मिळविण्याचे पाप जोडू नये. स्त्री ही मोहरू पी ठकाची मोठी फास आहे. ती मोह उत्पन्न करू न तृष्णा वाढ विणारी आहे. स्त्रीवरील अधिक प्रीतीमुळे धर्माकडील प्रवृत्ती कमी होते. स्त्री लोभ  वाढ विणारी आहे, परिग्रहावरील मूर्च्छा वाढ विणारी आहे( ध्यानस्वाध्यायाला विघ्न आणणारी आहे, विषयांध बनविणारी आहे, क्रोधादिक चारही कषयांची तीव्रता वाढ विणारी आहे. संयमाचा घात करणारी आहे, कलहाची मूळ आह, दुर्ध्यानाचे ध्यान आहे, मरण बिघडविणारी आहे. याप्रमाणे अनेक दषांचे मूळ कारण समजून स्त्रीवर फार प्रीती करू  नका. कलियुगातील मित्रही विषयमध्येच गुंतविणारे आहेत. अनेक व्यसनाकडे प्रवृत्ती करविणारे आहेत. धनवानाला पाहूनच धूर्त लोक त्याच्याशी मित्रता करतात निर्धनाशी भाषणसुद्धा करीत नाहीत. तेव्हा हे ज्ञानी मनुष्यांनो( संसारपतनाचे भय वाटत असेल तर अशा धूर्थांची मित्रता सोडून स्वधर्मावर प्रीती करा.

संसार निरंतर जन्ममरणाचे चक्र`आहे. जन्मल्या दिवसापासूनच ते मरणाकडे निरंतर प्रयाण करीत आहे. तुम्ही नंतानंत काल जन्ममरण करीत आहात. आता या पंचपरिवर्तनरू प संसारापासून सुटण्याचा विचार मनात आणा. पंचेंद्रियांचे विषय आत्म्याच्या स्वरू पाला भुलविणारे, तृष्णा वाढ विणारे व अतृप्ती करणारे आहेत. विषयासारखा ताप त्रैलोक्यात दुसरा नाही. विषय नरकादि दुर्गतीला नेणारे, धर्मापासून पराङ्मुख करणारे,

कषायाला वद्ध िणारे, ज्ञानाला विपरीत करणारे, विषासारखे प्राण हरण करणारे, विष आणि अग्नी सारखे दाह उत्पन्न करणारे आहेत( यास्तव ज्यंना आपले कल्याण करू न घेण्याची इच्छा असेल त्यांनी विषयावरील प्रीती सोडून द्यावी आणि विषयांचा त्याग करावा. शरीर रोगांचे स्थान आहे. महामलिन अशा दुर्गंधी सत्पधातूंनी भरलेले आहे. मलमूत्रादिकांनी व वात, पित्त, कफादि दोषांनी भरलेल्या शरीरात निरंतर क्षुधा, तृषेची वेदना उत्पन्न करणारे आहे. अपवित्रपणाचा पुंज असून प्रत्यही जीर्ण होत आहे. मरणाची वेळ आली म्हणजे कोटि उपाय केल्यानेही सांभाळले जात नाही. अशा शरीरापासून विर त राहणे हेच श्रेष्ठ आहे. याप्रमाणे पुत्र, मित्र, कलत्र, संसारभोग, शरीर हे सगळे दु:खरू प समजून वैराग्यभावनेचे चिंतन करणे हा संवेग गुण आहे.

धर्म शब्दाचा अर्थ वस्तूचा स्वभा असा ाहे. उत्तमक्ष ामादि दशलक्ष णरू पी धर्म आहे. रत्नत्रयस्वरू पी धर्म आहे. जीवदया हाही धर्म आहे. अशा रीतीने पर्यायबुद्धि शिष्याला समजावण्यासाठी धर्म शब्दाचे चार प्रकारचे वर्णन केले आहे. तथापि वस्तू जो आत्मा त्याचा स्वभाव दशलक्ष णधर्म आहे. क्ष ामा वगैरे दहा प्रकार हे आत्म्याचेच स्वभाव आहेत. तसेच सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्र हेही आत्म्याहून वेगळे नाहीत दया ही आत्म्याचाच परिणाम आहे. याप्रमाणे जिनेंद्रांनी सांगितलेला दशलक्ष णरू पी जो धर्म त्यामध्ये प्रीतीअसणे ह्या संवेग म्हणतात. कपटरहित रत्नत्रयधर्मामध्ये प्रीती करणे ही संवेगभावना आहे. तसेच मुनिधर्म आणि श्रावकधर्म ह्यामध्ये अनुराग असणे हाही संवेग आहे. प्राणिमात्राचे रक्ष ाण करण्यासाठी जीवदयेचे परिणाम असणे यास भगवंतानी संवेग म्हटले आहे. अथवा वस्तू जो आत्मा त्याचा स्वभाव केवलज्ञान आणि केवलदर्शन आहे, त्या स्वभावात लीन होणे हाही संवेग आहे. धर्माच्या फळाला अतंयत मिष्ट समजणे हा संवेग आहे. धर्मामध्ये प्रीतिरू पी परिणाम असणे हा संवेग आहे. तीर्थंकरपणा, चक्रवर्ती होणे, नारायण, प्रतिनारायण, बलभद्रादिक पुण्य पुरुष होणे हे धर्माचेच फळ आहे. स्वर्गामध्ये महान ऋद्धिधारक देव होणे, इंद्र होणे, अनुत्तरादिक विमानामध्ये अहमिंद्र होणे, केवली होणे हे सगळे पूर्वजन्मात आराधन केलेल्या धर्माचेच फळ आहे. तस` च भोगभूमीमध्ये उत्पन्न होणे, राज्यसंपदा प्राप्त होणे, अखंड ऐश्वर्य मिळणे, अनेक देशांमध्ये आज्ञा चालणे, पुष्कळ धनसंपदा प्राप्त होणे, रू पवान असणे, बलवान असणे, चातुर्य असणे, महान् पंडितपणा असणे, सर्व लोकात मान्यता मिळणे, निर्मळ कीर्ती पसरणे, बउद्धी उज्ज्वल असणे, आज्ञाधारक आणि धार्मिक अशा कुटुंबाचा वियोग होणे, सत्पुरुषाची संगती प्राप्त होणे, शरीर निरोग असणे, दीर्घ आयुष्य असणे, इंद्रिये चांगली असणे, न्यायमार्गाने प्रवर्तन करणे, गोड भाषण करणे इत्यादिक उत्तम सामग्री, मागे केव्हा तरी धर्मावर प्रीती केली असेल, धर्मात्म्याची सेवा केली असेल, धर्माची आणि धर्मात्म्याची प्रशंसा केली असेल, त्याचे फळ आहे. कल्पवृक्ष ा आणि चिंतामणिरत्न हे सगळे धर्मात्म्याच्या द्वारी उभे आहे असे समजा. धर्माच्या फळाचे माहात्म्य वर्णन करण्यास कोटी जिव्हांनी सुद्धा कोणी समर्थ नाही. याप्रमाणे धर्माचे फळ त्रैलोक ्यात उत्कृष्ट आहे असे जो जाणतो त्याला संवेगभावना होते. धर्मवान जीवांना पाहूनआनंदित होणे, धर्माच्या वर्णनामध्ये आनंद मानणे व विषयभोगापासून विर त होणे, हे संवेग नांवाचे पाचवे अंग आहे. ह्यात आत्म्याचे हित आहे असे समजून

ह्याचे निरंतर चिंतन करावे. या चिंतनापासून झालेल्या आनंदाने संवेगाच्या प्राप्तीसाठी ह्याचा महान् अर्ध्य उतरावा अशा रीतीने संवेग नावाच्या पाच्वा भावनेचे वर्णन केले.

### ६ शक्ति तस्त्यागभावना

आता शक्ति तप्रमाणत्यागभावनेचे वर्णन करतात.

ही त्याग नांवाची भावना मनुष्यजन्माचे भूषण आहे. आपल्या अंत:करणात त्यागभाव उत्पन्न होण्यासाठी अनेक धर्मोत्सव करावेत बाह्य अभ्यंतर अशा दोन प्रकारच्या परिग्रहावरील ममत्व सोडल्याने त्यागधर्म घडो. १) अंतरंग परिग्रह मिथ्यात्व २) वेद, ३) हास्य, ४) रति, ५) अरति, ६) शोक, ७) भय, ८) जुगुप्सा, ९) राग, १०) द्वेष ११) क्रोध, १२) मान, १३) माया, १४) लोभ असे चादा प्रकारचे परिग्रह आहेत.

१) शरीरादिक परद्रव्यामध्य आत्मबुद्धी करणे ह्याला मिथ्यात्व नावाचा परिग्रह म्हणतात. वस्तू आपले द्रव्य, आपले गुण आणि आपले पर्याय स्वरू पाने असते. जसे सुवर्ण द्रव्य आहे. त्याचे गुण पीतादिक आहेत आणि कुंडलादिक आकार त्याचे पर्याय आहेत. तथापि हे सगळे सोनेच आहे. सोने ही अन्य वस्तू नाही आणि अन्य वस्तू ही सोने नाही. सोने आहे ते सोन्याचेच आहे एक वस्तु कधी दुसऱ्या स्वरू पी झाली नाही, कधी होत नाही आणि कधी होणार नाही. आपले स्वरू पर आहे तेच आपले आहे. तसेच आत्मा आत्माच आहे. आत्म्याचे अन्य कोणतेही द्रव्य होऊ शकत नाही. शरीरालाच आत्मा समजून मी गोरा, मी रा, मी रंक, मी मालक, मी चालक, मी ब्राह्मण, मी क्षत्रिय, मी वैश्य मी शूद्र, मी म्हातारा, मी तरू ण, मी बलवान, मी निर्बल, मी मनुष्य, मी तिर्यंच अशी मनात कर्मकृत पर्यायाविषयी आत्मबुद्धी धारण करणे हा मिथ्यात्व नावाचा परिग्रह आहे. मिथ्यादर्शनाच्या योगानेच माझे घर, माझा मुलगा, माझे राज्य मानून समस्त परपदार्थामध्ये आत्मबुद्धी करावीशी वाटते. शरीराचा नाश झाला म्हणजे आपला नाश झाला, शरीराचा वाढ ण्याने आपण वाढ लो, शरीर कृश होण्याने आपण कृश झालो असे समजतो. पर्यायामध्ये अशी आत्मबुद्धी ठेवल्यामुळे अनादि काळापासून हा स्वत:ला विसरला आहे म्हणून संपूर्ण परिग्रहामध्ये याला आत्मबुद्धी होत आहे. हाच मिथ्यात्व परिग्रह होय.

२) वेदकर्माच्या उदयाने स्त्री-पुरुषांमध्ये जे कामसेवन करण्याचे परिणाम होतात त्या कामभावनेला आत्मभाव मानणे हा वेदपरिग्रह आहे. काम शरीराचा विकार आहे. त्याला आपले स्वरू प मानणे हा वेदपरिग्रह होय.

३) थट्टामस्करीमध्ये आसक्त होणे हा हास्यपरिग्रह आहे.

४) पंचेंद्रियांना आवडणाऱ्या भोग उपभोगामध्ये लीन होऊन जाणें हा रतिपरिग्रह आहे.

५) अनिष्ट व्सतूंचा संयोग झाला असता परिणाम संक्लेशित होणे ह्यास अरतिपरिग्रह म्हणतात.

६) आपले इष्ट, स्त्री, पुत्र, मित्र, धन उपजीविका नाहीशी झाल्यानेते पुन: मिळावे म्हणून तळमळ करणे, रडणे या शोकपरिग्रह म्हणतात.

७) आपले मरण होईल किंवा इष्टमित्राचा आणि परिग्रहांचा नाश होईल म्हणून नेहमी भय बाळगणे हा भयपरिग्रह होय.

८) घाणेरडे पदार्थ पाहिल्याने, ऐकल्याने, चिंतन केल्याने, स्पर्श झाल्याने मनामध्ये जो किळस उत्पन्न होतो त्याला जुगुप्सापरिग्रह म्हणतात.

९) धन, ऐश्वर्य, पुत्र, स्त्री, आभरणादिक परद्रव्यांमध्ये आसक्त असणे हा रागपरिग्रह आहे.

१०) दुसऱ्याचे वैभव, परिवार, ऐश्वर्य, पंडित्य वगैरे पाहून वैरभाव करणे हा द्वेषपरिग्रह होय.

११) परिणामामध्ये क्रोध येऊन संपन्न होणे ह्याला क्रोधपरिग्रह म्हणतात.

१२) उच्च कुल, जाति, धन, ऐश्वर्य, रूप, बल, ज्ञान, बुद्धी ह्यांनी आपण इतरापेक्षा श्रेष्ठ आहोत असे मानून गर्व करणे व आपणापेक्षा इतर कमी असे समजून त्यांचा निरादाम करणे व कठोर परिणाम ठेवणे हा मानपरिग्रह आहे.

१३) अनेक तऱ्हेने कपटाचरण करण्यासाठी परिणाम वक्र ठेवणे याला मायापरिग्रह म्हणतात.

१४) परद्रव्यग्रहण करण्यामध्ये तृष्ण ठेवणे याला लोभपरिग्रह म्हणतात.

असे हे संसारपरिभ्रमणाला कारण व आत्म्याच्या ज्ञानादिक गुणांचे घातक चौदा प्रकारचे परिग्रह आहेत. ह्यांच्या संयोगाने धन, धान्य,क्षेत्र, सुवर्ण, स्त्री, पुत्रादि चेतन अचेतन पदार्थाविषयी ममत्व उत्पन्न होते. म्हणून यांना बाह्य परिग्रह म्हटले आहे. या अंतरंग बहिरंग दोन्ही प्रकारच्या परिग्रहांचा त्याग केल्याने त्यागधर्म घडतो. कदाचित बाह्यपरिग्रह कोणाजवळ नसतो म्हणून तो सोडता येईल पण अभ्यंतर परिग्रहाचा त्याग करणे अतिशय कठिण आहे. या दोन्ही प्रकारच्या परिग्रहांचा एकदेशत्याग श्रावकाला घडतो व संपूर्ण त्याग मनीला घडतो.

कषयांचा त्याग केल्याने त्यागधर्म घडतो. इंद्रियाला विषयापासून रोकण्याने त्यागधर्म घडतो. रसांचा त्याग केल्याने त्यागधर्म होतो, कारण रसनेंद्रियांची लोलुपता जिंकण्याने समस्त पापांचा त्याग सहज होतो.

जिनेंद्राच्या परमागमाचे अध्ययन करणे, दुसऱ्या करविणे, शास्त्रे लिहून देणे, शोधणे, शोधविणे, हे सगळे प्रकार मोठ्या उपकाराचे आहेत व ह्यापासून त्यागर्धम घडतो.

मनातील दुष्ट विकल्प नाहीसे करणे आणि दुष्ट विकल्पाची कारणे सोडून चा अनुयोगांच्या चर्चेमध्ये चित्त लावणे हाही त्यागर्धम आहे.

मोहाचा नाश करणारा धर्म आहे. तेव्हा मोहाचा नाश होईल असा धर्मोपदेश श्रावकाला देणे हा महत्पुण्य उत्पन्न करणारा त्यागधर्म आहे. कारण वीतराग धर्माच्या उपदेशापासून अनेक प्राण्यांचे मन पापापासून भयभीत होते आणि अनेक प्राणी धर्ममार्गाला लागतात.

उत्तम, मध्यम आणि जघन्य अशा प्रकारच्या पात्राला भक्तिपुर:सर आहार दान देणे, शुद्ध औषध देणे, ज्ञानाची उपकरणे म्हणजे सिद्धांत शिकण्यायोग्य पुस्तक दान देणे, मननीला व श्रावकाला योग्य वसतिकादान देणे हा त्यागधर्मच आहे. गुणवानाला ज्या दानाने त्याची तपोवृद्धी होईल, स्वध्यायात लक्ष लागेल, ध्यानात एकाग्रता होईल अशा प्रकारच्या आहारादिक चार प्रकारचे दान मोठ्या भक्तीने चित्त प्रसन्न ठेवून, आपला जन्म कृतार्थ झाला आणि आपला गृहस्थाश्रम सफल झाला असे मानून मोठ्या आदराने देणे असे पात्रदान जे महान् भाग्यवान् आहेत व ज्यांचे पुढे चांगले व्हावयाचे असेल त्यांच्याच हाताने घडते. पात्राचा लाभ होणे हेही दुर्लभ आहे. तेव्हा भक्तिसहीति पात्रदान ज्याला घडले त्याला त्यागधर्म घडला.

क्षुधा तृषेने जे पीडित असतील, रोग, दरिद्री, वृद्धी, दीन असतील त्यावर दया करून दान देणे हा सगळा त्यागधर्म आहे. त्यागानेच मनुष्यजन्म सफळ होतो. त्यागानेच धन-धान्यादिक प्राप्त होण सफल आहे. त्यागावाचून गृहस्थाचे घर स्मशानासारखे आणि अशा घराचा मालक प्रेतासारखा असून घरातील स्त्री पुत्रादिक हे गृध्रपक्षासारखे समजावेत. कारण ते आपले धनरूपी मांस तोडतोडून खातात. ह्याप्रमाणे त्यागभावनेचे वर्णन केले.

## ७ शक्तितस्तपोभावना

आता शक्तितस्तपोभावनेचे वर्ण करात.

हे शरीर दु:खाला कारण आहे. अनेक प्रकारचे दु:ख हे शरीर उत्पन्न करते. हे शरीर अनित्य आहे. अस्थिर आहे, अशुचि आहे. कृतघ्न आहे. कट्यावधि उपकार केल्याने कृतघ्न मनुष्य आपला होत नाही तसे ह्या शरीराची अनेक प्रकारे सेवा केल्याने व याव अनेक उपकार केले तरी ते आपले होत नाही. म्हणून ह्याला यथेच्छ पुष्ट करणे योग्य नाही. तथापि याच्याकडे अगदी दुर्लक्ष करणेही बरे नाही, कारण हे सद्‌गुणांच्या संचयाचे साधन आहे. शरीराशिवाय रत्नत्रयधर्म साधत नाही. रत्नत्रयधर्मावाचून कर्माचा नाश होत नाही. म्हणून आपल्या प्रयोजनासाठी विषयामध्ये आसक्ती न ठेवता नौकराप्रमाणे ह्याला योग्य भोजन देऊन यथाशक्ते जिनंद्राच्या मार्गाला अनुसरून कायक्लेशादि तप करविणे योग्य आहे.

तपावाचून इंद्रियाची विषयावरील लोलुपता कमी होत नाही. त्रैलोक्याला जिंकणारा काम नाहीसा करण्यात तपावाचून दुसरे शस्त्र नाही. तपावाचून आत्म्याला अचेत करणारी निद्रा जिंकली जात नाही, शरीराला सुख देण्याची सवय तपावाचून मोडत नाही. शरीराला तप करण्याची सवय लावलेली असली म्हणजे क्षुधा, तृषा शीत, उष्ण इत्यादि दु:खे प्राप्त झाली तरी घाबरेपणा होत नाही आणि आपण आपल्या नियमधर्मापासून चलायमान होत नाही. तप हे कर्माची निर्जरा होण्याला कारण आहे म्हणून तप करण्याची आवश्यकता आहे. आपली शक्ती न छपविता व जिनेंद्राच्या मार्गाला विरोध न येईल असे तप करा. तपरूपी शिपायाच्या साह्यावाचून आपल्या श्रद्धान, ज्ञान आचरणरूपी धनाला काम, क्रध, प्रमादादिक लुटारू लुटून नेतील आणि रत्नत्रयरूपी संपदा नाहीशी झाल्याने चतुर्गतीरूप संसारामध्ये दीर्घकालपर्यंत भ्रमण करावे लागेल, यासाठी ज्या प्रकाच्या तपाने वात, पित्त, कफ हे त्रिदोष न बिघडतील व रोगादिक उत्पन्न होणार नाहीत अशा प्रकारचे तप करणे योग्य आहे.

सर्व तपामध्ये प्रधानतप म्हणजे दिगंबरपणा धारण करणे आहे. यामुळे घरातील ममतारूपी पाश तुटून शरीरसंबंधी सगळी सुखे भोगण्याची सवय मोडते. शरीराने शीत, उष्ण, डास, मत्सर, माशा वगैरेचा त्रास सोसण्याची शक्ती येते. लंगोटीचाही त्याग करून दहा दिशा हेच वस्त्र आहे असे मानून दिगंबरपणा धारण करणे हे उत्कृष्ट तप आहे. दिगंबर स्वरूप पाहून व एकूण मोठमोठे शूर वीर देखील आश्चर्यचकित होतात. संसारबंधनापासून सुटावे असे इच्छीत असाल तर दिगंबर जिनदीक्षा धारण करा. शरीराला सुख भोगण्याची सवय नाहीशी करा. उपसर्ग व परीषह सहन करतांना घाबरे न होता ते शांतपणे सहन करा. तप:प्रभावाने स्वर्गलोकातील रंभा किंवा तिलोत्तमा आपल्या हावभा-विलासविभ्रमादिकांनी तुमचे मन चलायमान करू शकरणार नाही.

ज्या तपाने अशा आणि काम नाहीसे होतात तेच तप खरे. ज्या तपाने दोन्ही प्रकारच्या परिग्रहावरील इच्छा नाहीशी होईल तेच तप खरे ज्या तपाने इंद्रियांच्या विषयावरील प्रवृत्ती मिटेल तेच तप खरे. तपाकरिता निर्जन वन आणि पर्वताच्या भयंकर गृहेत राहावे. तेथे भूत राक्षसादिकांचे अनेक विकास दिसून येतात, सिंह व्याघ्रादिक भयंकर जनावरांचे वास्तव्य असते, कोट्यवधि वृक्षांच्या दाटीमुळे गडद अंधार पडला असता सर्प, अजगर, अस्वल, चित्ते, लांडगे इत्यादिक दुष्ट तिर्यंचांचा संचार असतो. अशा जागी भय सोडून ध्यान-स्वाध्यायामध्ये निराकुल होऊन राहणे हेच तप खरे. आहार मिळाला अथवा न मिळाला तरी शांतपणा ठेवून गोड, आंबट, कडू, तुरट, थंड, ऊन, सरस, नीरस जसे भोजपाणी मिळेल तसे लालसा सोडून खाऊन संतोष वृत्तीने राहणे तेच तप खरे. दुष्ट देव, दुष्ट मनुष्य, दुष्ट जनावरे ह्यांनी घोर उपसर्ग केला तरी घाबरे न होता तो समह करततततते हेच तप खरे. या पासून बहुत काळाच्या संचय झालेल्या कर्माची निर्जरा होते. आपणास दुर्वचन बोलणारे, निंद्य दोष लावणारे, मारणारे, तोडणारे, अग्नीत जाळणो वगैरे अनेक उपद्रव देणारे भेटले

तरी त्यांच्याविषयी द्वेषबुद्धी न ठेवणे हेच तप खरे तसेच आपली अतुती, पूजन वगैरे करण्याविषयी रागभाव न उत्पन्न होऊ देणे तेच तप खरे.

पंच महाव्रते धारण करणे, पंच समिति पाळणे, पंचेद्रियांचा निरोध करणे, सहा आवश्यक क्रिया वेळच्याय वेळी करणे, आपल्या मस्तकाचे, दाढीचे, मिशाचे केस उपटून लाच करणे हे तपच आहे. दोन महिन्यांनी लोच करणे तो उत्कृष्ट लोच: तीन महिन्यांनी करणे तो मध्यम! आणि चार मिहन्यांनी करणे तो जघन्य लोच समजावा. लोचकरणे हेही तपच आहे. जैनमुनी अन्यभेषधाऱ्यासारके रोज केश उपटीत नाहीत. थंडीच्या दिवसात, उन्हाळ्यात आणि वाससाळ्यात देखील नग्न राहतात. स्नान न करणे, भूमीवर निजे, तेही फार थोडा वेळ निजणे, वोटाने मा न घालणे, एकादिवसात एकच वेळा व उभ्याने भोजन करणे, सरस नीरसवगैरे स्वाद सोडून भोजन करणे असे अठ्ठावीस मूलगुण अखंड पाळणे हे मोठे तप आहे. ह्या मूलगुणांच्या प्रभावाने घातिकर्माचा नाश होऊन केवलज्ञान प्राप्त होते. यास्तव हे ज्ञानी जन होत, तप हे धर्माचे अंग आहे. हे आपल्या हातून निर्विघ्न पाळले जावे म्हणून याचे स्तवन पूजनादिक करून महान अर्ध्य उतरा. ह्याच्या योगाने अत्यंत दूर व परोक्ष अशा जो मोक्ष जो तुमच्या अगदी जवळ येईल.अशा ह्या शक्तितस्तप नांवाच्या सातव्या भावनेचे वर्णन केले.

८ साधुमसमाधिभावना

आता साधुसमाधि नावाची आठवी भावना सांगतात.

घराला आग लागली असता त्यातील वस्तूंचे रक्षण करण्यासाठी आग विझणे आवश्यकअसेत. त्याप्रमाणे व्रतशीलादि गुणानी युक्त असणाऱ्या संयमी व सु पुरुषावर संकट प्राप्त झाले असता ते नाहेस करण्याचा प्रयत्न करून त्याच्या व्रतशीलाचे रक्षण करणे याला साधुसमाधि म्हणतात. गृहस्थाने मरण आले अथवा काही उपसर्ग प्राप्त झाला, रोग झाले, इष्टा वियोग व अनिष्ट, संयोग झाला त्यावेळी भयभीत न होणे ही देखील साधुसमाधि आहे.

अशा प्रसंगी सम्यग्ज्ञानी असा विचार करतो की, हे आत्मन्, तू अखंड, अविनाशी, ज्ञानदर्शनस्वभावाचा आहेस. तुला मरण नाही. जे उत्पन्न झाले आहे. त्याचा नाश होणारच. पर्यायाचा नाश होतो, द्रव्याचा नाश होत नाही. पाच इंद्रिये आणि मनोबल, वचनबल, कायबल, आयुष्य आणि श्वासोच्छ्वास असे दहा प्राण आहेत ह्यांच्या नाशाला मरण म्हणतात. ज्ञान, दर्शन, सुख, सत्ता इत्यादिक भावप्राणांचा कधीही नाश होत नाही. म्हणून शरीराच्या नाशाला आपला नाश मानणे हे मिथ्याज्ञान आहे. अरे हे शरीर हजारो किड्यांनी भरलेले व डाहे, मांस, रक्त इत्यादिक घाणेरड्या पदार्थाचे बनलेले आहे. ते नाहीसे झाले म्हणून काय बिघडले( तू अविनाशी

ज्ञानमय आहेस. मृत्यू हा मोठा ुपकार करणारा मित्र आहे. कारण तो तुला जुन्या कुजलेल्या शरीरातून काढून देवादिकाचे उत्तम शरीर प्रपात् करू न देईल. मृत्यू मित्र नसता तर या शरीरात किती तरी काळपर्यंत तुला रहावे लागले असते. मग रोगी आणि दु:खाने भरलेल्या ह्या शरीरातून तुला कोणी कढ्ढ ले असेत ( आण समाधिमरण वैगरेनी तुझ्या आत्म्याचा उध्दार कासा झ ाालाअसता( व्रत,तप, संयम, ह्यांचे उत्तम फळ जे परलोकी तुला मिळवयाचे ते मृत्यूरू पी मित्रांच्या उपकारावाचून कसे मिळाले असेत( मृत्यू नसता तर पापाचे भय तरी कोणी बाळगले असेत( मृत्यूरुपी कल्पवृक्षाच्या अभावी चार आराधनांचे शरण ग्रहण करवून संसारपुपी चिखलातून तुला कोणी कढ्ढ ले असते( सारांश, संसारामध्ये ज्यांचे चित्त आसक्त त आहे व जे शरीरालाच आपले स्वरू प समजतात त्यंना मात्र मरणाचे भय वाटते. परंतु सम्यग्दृष्टी आपणाला शरीरापासून वेगळे समजतात. म्हणून त्यांना मरणाचे भय वाटत नाही. अशआ पुरुषांना साधुसमाधि घडते.

सम्यग्दृष्टीला मरणसमयी रोगदु:खादिक प्राप्त झाले तर ते शरीरावरील ममत्व सोडविण्यासाठी व त्यासंयमादिक पाळिवण्यासाठीच आहेत व प्रमाद सोडून सम्यग्दर्शनादि चार आराधनांमध्ये मन दृढ होण्यासाठीच आहे असे वाटते. मी ज्या अर्थी मला मरण येणाररच. मी घाबरा झालो तरी आणि धैर्य धरू न राहिलो तरी मृत्यू मला सोडणार नाही. त्याअर्थी दुर्गतीचे कारण असे तळमळीचे मरण नको.धैर्य टिकून शरीर जावे आणि ज्ञानदर्शन स्वरुपाचा नाश न होँल असे मरण यावे अशीच त्याची इच्छा असते. यावरू न सम्यग्दृष्टीने मरणाचे भय न बाळगणे हीच साधुसमाधि होय.

देवकृत, मनुष्यकृत, तिर्यंचकृत उपसर्ग आल्याने ज्याला भय वाटत नाही व ही सगळी आपण केलेल्या पूर्वक्रमांची निर्जरा आहे असे जो मानतो, त्याला साधुसमाधि घडते. ज्ञानी मनुष्य रोगाचे भय मानीत नाही, कारण आपेल शरीर हाच मोठा रोग आहे असे तो मनतो. शरीरामुळे क्षुधा, तृषा वगैरे रोग निरंतर होत आहेत. मनुथ्याचे शरीर है वात, पित्त, कफ अइशा त्रिदोषाचे आहे. असता वेदनीय कर्माच्या उदयाने हे त्रिदोष कमी झ ाास्त झाले म्हणजे ज्वर, कास, श्वास, उदर, अतिसार, शूल, मस्तकूल, नेत्ररोग, वातरोग, इत्यादि रोग होतात.त्यावेळी ज्ञानी असे समजतो की, हे रोग मला उत्पन्न झाले याला असातावदेनीय कर्माचा उदय हे अंतरंग कारण आहे आणि द्रव्य , क्षेत्र काल वगैरे बाह्य कारण आहेत तेव्हा सातावदेनीय कर्माचा उदय व असाताच उपशम झिाल्याने रोग मिटेल, जर असाता कर्माचा उदय जोरावर असेल तर ह्या औषधादिक हे रोग मिटिवण्यास समर्थ होणार नाहीत. असाताकर्म नाहीसे करण्यास कोणाही देव, दानव, मंत्र तंत्र, औषधादिक हे समर्थ नाहीत. म्हणून तळमळ सोडून शांती ठेवावी. बाह्य औषधादिक असाताकर्माचा मंद उदय असल्यावेळी सहकारी कारण होतात जेव्हा असाताच तीव्र उदय असतो त्यावेळी औषधादिक बाह्य कारणे रोग मिटवू शकत

नाहीत. असा विचार करू न असताकर्माच्या नाशाचे कारण जो परम शांतभाव तो धारण करू न तळमळ न करता वेदना सहन कराव्या, घाबले होऊ नये हीच साधुमसमाधि आहे.

इष्टाचा वियोग किंवा अनिष्टाचा संयोग झाल्यावेळी ज्ञानाची दृढ ता ठेवून भयभीत न होणे ह्याला साधुसमाधि म्हणतात. जो मनुष्य, जन्म, जरपा, मरणरू पी संसाराचे भयबाळगतो व सम्यग्दर्शनादिगुणांनी युक्त असतो तो आराधनासहित समाधिमरणची इच्छा करतो. तो निर्भय होून शरारादिक परद्रव्यावरील ममत्व सोडून व्रत संयमामध्ये चित्त ठेवतो. संसारामध्ये परिभ्रमण करीत करीत अनंतानंत काळ गेला, सर्वांचा समागम अनेक वेळा प्राप्त झाला, परंतु समाधिमरण प्राप्त झाले नाही. ते एक वेळ झाले असेत तर जन्ममरणाला पात्र झ ालो नसतो. संसार-परिभ्रमण करताना मी अनेक नवीन देह धारण केले, धारण केला नाही असा एकही देह राहिला नाही. आता हल्लीच्या शरीरावरच काय म्हणून ममत्व करू ( तसेच मला प्रत्ये जन्मात अनेक स्वजन कुटुंबीजनांचा संबंध झालेला आहे. आजच हे स्वजय मिळाले आहेत असे नाही. तेव्हा आता कोणकोणत्या स्वजनावर मी  मोह करु( आजच्या या एव्ढ्याशा संपत्तीपेक्षा मोठमोठी राजर्ध्दि कित्येक जन्मात मिळाली आहे, मग या य:कश्चित संपदेवर तरी काय म्हणून ममत्व करू ( प्रतिजिन्मात पालन करणारे मातापिताही अनेक होऊन गेले. आजच्या मातापित्यांनीच पालन केले नाही. अनेक जन्मात पुरष होऊन तसेच स्त्री होऊन जन्मलो आणि कित्येक जन्मात तीव्र कामवासनेने नपुंसकपणाही प्राप्त झाला, तथापि लिंगाभिमानाने तेही सर्व भोगले. संसारात असे कोमतेही दु:ख नाही की जे अनेक वेळा भोगले नाही. तसेच असे कोणते इंद्रियजनित सुखही नाही की, ते अनेकवेळा भोगले नाही. मी अनेक वेळा नरकात नारकी होऊन असंख्यात काळपर्यंत नाना प्रकारची दु:खे भोगली. अनेकवेळा तिर्यंचाच्या जन्माला गेलो. तेथे अनेकप्रकारचे दु:ख भोगले,तेथे अनंत वेळा जन्ममरण करीत  करीत अनेक प्रकारची दु:खे भोगीत भोगीत प्ररिभ्रमण केले. अनेक वेळा मनुष्यजन्मही घेतले, तेथे धर्मवासना सोडून मिथ्यादृषअटी झालो. अनेक वेळा देवलोकातही जन्म झाला, अनेक जन्मात जिनेंद्राची पूजाही केली. अनेक जन्मात गुरुवंदनाही केली, अनेक जन्मात मिथ्यादृष्टी होून कपटाने आत्मनिंदाही केली, अनेक जन्मादुर्धर तपही धारण केले, अनेक जन्मात भगवंताच्या समवसरणात जाऊन बसोल, अनेक जन्मात श्रुतज्ञानाच्या अंगाचे पठनपाठनही केले पण जन्ममरण चुकविता आले नाही. जिनेंद्रचे पूजन करणे, गुरुची वंदना करणे, आत्मिनंदा करणे, दुर्धर तपश्चरण करणे, समवसरणात  जाणे, श्र ुताच्या अंगाचा अभयास करणे इत्यादिक कृत्ये प्रशंसनीय आहेत, पापनाशक आणि पुण्यकारक आहेत, तथापि सम्यग्दर्शनावाचून ती कृतार्थ होत नाहीत व संसापरिभ्रमणाला रोखू शकत नाहीत. सम्यग्दर्शनाशिवाय सगळ्या क्रिया पुण्यबंध करणाऱ्या आहेत. जेवाह त्या सम्यग्दर्शनयुक्त असतील तेव्हाच त्या संसाराचा नाश करतील. आत्मानुशासनात म्हटले आहे. -

शमबोधवृत्ततपसां पाषाणस्येव गौरवं पुंस: ।

पूज्यं महामणेरिव तदेव सम्यक्त्वसंयुक्तं ।। १ ।।

अर्थ - पुरुषाला नुसता साम्यभाव, ज्ञान चारित्र आणि तप ह्यांचा महानपणा पषाणाच्या ओझ्याप्रमाणे आहे आणि हेच साम्यभाव, ज्ञान चारित्र आणि सम्यक्त्वसहित असतील तर महामण्यासारखे पूज्य होतील.

भावार्थ - जगामध्ये रत्ने आणि दगड एकाच जातीचे आहेत. परंतु दगड जर मण दोन मण बांधून नेले तर त्यांची किंमत पैसा दोन पैसेच येईल. तेवढ्याने एक दिवस देखील पोट भरणार नाही. परंतु तोळा दोन तोळेच जर हिरेमाणिक विकले तर त्याचे हजारो रुपये येतील. त्याप्रमाणे साम्यभाव, शास्त्रज्ञान, चरित्रधारण आणि घोर तपश्चरण हे सम्यक्त्वावाचून पुष्कळ काळपर्यंत धारण केले तर त्यापासून राज्यसंपदा प्रपात् होईल, मंदकषायाच्या योगाने देवलोकात जन्म होईल, पण फिरून एकेंद्रियातही पडावे लागेल. उलट जर हीच सम्यक्त्वसहित असली तर संसारपरिभ्रमणाचा नाश करून मुक्तीलाच पोहोचवतील. म्हणून सम्यक्त्वाशिवाय मिथ्यादृष्टि असेल जो जिनेश्वराची पूजा करो, गुरुवंदना करो, समवसरणात जावो, श्रुताचा अभ्यास करो, तप करो, तरी तो अनंतकाळ संसारातच वास करील. या तीन लोकात ह्या जीवाला सुखदु:खाची संपूर्ण सामग्री अनेक वेळा प्राप्त होणे दुर्लभ नाही. साधुसमाधि मात्र कधीही प्राप्त झाली नाही तो मात्र दुर्लभ आहे. ती आपणाला बरोबर घेऊन जावयाची आहे. म्हणून रत्नत्रय धारण करून जो देह सोडतो त्यालाच साधुसमाधि प्राप्त होते. साधुसमाधि चतुर्गतीत परिभ्रमण करणाऱ्याच्या दु:खाचा नाश करून निश्चल, स्वाधीन, अनंतसुखाला प्राप्त करून देते. जो पुरुष साधुसमाधिभावना प्राप्त होण्यासाठी तिला महान अर्ध्य देतो तो लौकरच संसारसमुद्रातून तरून आठ गुणाचा धारण करणारा सिध्द होतो.

याप्रमाणे साधुसमाधि नावाच्या आठव्या भावनेचे वर्णन केले.

## ९ वैयावृत्त्यभावना

वैयावृत्य म्हणजे मुनि अथवा श्रावक, ज्यावेळी ज्वर, संग्रहणी, श्वास, शूल, उदर वगैरे रागांनी पीडित असतील त्यावेळी त्यास शुध्द औषद, योग्य पथ्य, हवेशीर जागा देऊन व त्याची सेवाचाकरी करणे, त्यांच्याशी गोड बोलणे वगैरे उपायांनी त्याचे दु:ख दूर करण्याचा प्रयत्न करणे होय. वैयावृत्य हे मुनीच्या दहा भेदाप्रमाणे दहा प्रकारेच आहे. १) आचार्य, २)उपाध्या, ३) तपश्वी, ४) शैक्ष, ५) ग्लान, ६) गण, ७) कुल, ८) संघ, ९) साधु आणि १०) मनोज्ञ अशा ह्या दहा प्रकारच्या मुनीमध्ये परस्पर वैयावृत्य होत असते. अंगमेहनतीने असेच अन्य पदार्थांनी दु:ख व वेदना दूर करण्यासाठी प्रयत्न करणे वैयावृत्य होत. दहा मुनींच्या भेदांचे लक्षण असे आहे.

१) स्वर्गमोक्षाला साधनभूत व्रताचे आचरण करतात त्यास आचार्य म्हणावे. २) ज्यांच्या जवळ राहून आगमाचे अध्ययन करण्यात येते, जे व्रतशीलधारी श्रुताचे आधार ते उपाध्याय होत. ३) महान अनशानादि

तपामध्ये तत्पर असतात ते तपस्वी होत. ४) जे श्रुताच्या अभ्यासामध्ये आणि व्रत्याच्या भावनेमध्ये निरंतर तत्पर असतात त्यास शैक्षा म्हणावे. ५) रोगादिकांमी ज्यांचे शरीरक लेशित असते त्यास ग्लान म्हणावे. ६) वृध्द मुनींच्या समूहाला गण म्हणावे. ७) शिष्यांना दीक्षा देणाऱ्या आचार्यांच्या समूहाला कुल म्हणतात ८) चार प्रकारच्या मुनींचा जो समूह त्याला संघ म्हणतात. ९) फार दिवसापूर्वी दीक्षा घेतलेला असेल त्याला साधु म्हणतात आणि १० ) जो विद्वत्तेने, वक्तृत्व-गुणाने आणि उच्च कुळामध्ये लोकांमध्ये मान्य आहे व धर्माचे आणि गुरुकुलाचे गौरव वाढविणारा आहे त्याला मनोज्ञ म्हणतात. अथवा असंयत समयग्दृष्टीही संसाराच्या अभावारूप अपेक्षेने मनोज्ञ आहे. ह्या दहा प्रकारच्या मुनींना रोग झाला किंवा परीषहामुे दु:ख होत असेल किंवा त्यांचे श्रध्दान बिघडून मिथ्यात्वादिकाकडे प्रवृत्ती होण्याचा संभल असला तर त्यांना प्रासुक औषध, योग्य आहारपान, निरोगी जागा, काष्टाचे आसन , उपदेशादिकांनी व पुस्तक पिंछी वगैरे धर्मोपकरणांनी, पुन: सम्यक्त्वामध्ये स्थिर करणे हे वैयावृत्य आहे.

आजारी मुनीची थुंकी व मलमूत्र वगैरे स्वत: दूर करून त्यांना बरे वाटेल अशी सेवाचारी करावी हे वैयावृत्त आहे. ह्यामुळे संयमाची स्थापना, ग्लानीचा अभाव आणि दुसऱ्याच्या सद्‌गुणावर प्रीती इत्यादि अनेक गुण आपणात प्रगट होतात. वैयावृत्त हा उत्कृष्ट धर्म आहे. वैयावृत्य नसले तर मोक्षमार्ग राहणार नाही. आचार्य स्वत: रोगी शिष्याचे, रोगी मुनीचे वैयावृत्य करतात. त्यामुळे त्यांची उच्चता दिसून येते. असेच श्रावकांनीही मुनींचे, श्रावकांचे आणि श्राविकेचे देऊन वैयावृत्य करावे. कोणाला कर्माच्या उदयाने दोष लागला असल्यास तो झाकावा. ज्याचे चलायमान झाला असेल त्याला पुन: धर्मात स्थिर करावे. अशा उपकार करण्यानेही वैयावृत्य होते. आचार्य शिष्याला श्रुतज्ञानाचा अभ्यास करवितात आणि व्रतसंयमादिकांच्या शुद्धीचा उपदेश करतात. ह्य योगाने ते शिष्याचे वैयावृत्य करतात. जे शिष्य गुरूंच्या आज्ञेप्राणे वागून त्यांच्या चरणांची सेवा करतात ते चार्यांचे वैयावृत्य करतात असे समजावे.

आपल्या चैतन्यस्वरूप आत्म्याला रागद्वेषादिक दोषांनी लिप्त न होऊ देणे हे आपल्या आत्म्याचे वैयावृत्य आहे. तसेच आपल्या आत्म्याला परमागमांच्या चिंतनात व दशलक्षणरूपी धर्मामध्ये गुंतवून ठेवणे हेही आत्मवैयावृत्य आहे. काम, क्रोध लोभादिकांच्या आणि इंद्रियांच्या विषयांच्या स्वाधीन न होणे हेही आत्म्याचे वैयावृत्य आहे.

रोगी मुनीचे आणि गुरूचे प्रात: काळी व संध्यकाळी शयन, आसन, कमंडलु, पिंछी, पुस्तक डोळ्यांनी पाहून, मयूरपिंछीने झाडणे व अशक्त किंवा रोगी मुनी असतील त्यास आहार औषधादिक संयमाला अनुसरून देणे, त्यास धर्माला उपदेश देऊन त्यांचे चित्त धर्मामध्ये लीन करणे, त्यास उठविणे, बसविणे, ह्या अंगावरचे त्या अंगावर करणे, परसाकडे बसविणे, लघवीला बसविणे इत्यादि कृत्यांनी वैयावृत्य करावे. तसेच कोणी साधु पुरुष रस्त्यामध्ये थकून गेला असेल, अथवा कोणाला नीच लोकाकडून, दुष्ट राजाकडून,

तिर्यंचाकडून उपद्रव्य होत असेल, किंवा कोणी दुष्काळामुले, महामारीमुळे, देवीच्या आजराने, प्लेगाने आजारी होऊन घाबरा झाला असेल, तर त्याला जागा देऊन, त्याचे कुशल विचारू न, आदराने उपदेश देऊन, त्याचे मन स्वस्थ करणे हे वैयावृत्यच आहे. जो समर्थ असूनही वैयावृत्य करीत नाही तो अधर्मी समजावा. त्याने तीर्थकराच्या आज्ञेचा भंग केला, जिनागमात सांगितलेल्या धर्माची विराधन केली, आचार बिघडविला आणि प्रभावना नष्ट केली. धर्मात्मा माणसाला विपत्काळी ज्याने उपकार केला नाही तो धर्मापासून पराङ्मुख झाला असे समजावे. मोहरू पी अग्नीने जळत असलेल्या जगामध्ये एखादाच दिगंबरमुनी ज्ञानरू पी जलाने मोहरू पी अग्नीला विझवून आत्मकल्याण करतो. जे कामविकाराला नाहीसे करू न राग, द्वेष सोडून व इंद्रियाच्या विषयांना जिंकून, आत्महितासाठी उद्युक्त झाले आहेत ते धन्य होत. अशा लोकोत्तर गुणांना धारण करणाऱ्यांच्या चरणकालांना शरण जाण्याचे परिणाम वैयावृत्य केल्यानेच होतात आणि जसजसे सद्गुणाविषयी प्रेम वाटू लागते तसतसे श्रद्धान बळकट होत जाते. श्रद्धान वाढते म्हणजे धर्मावर प्रीती वाढते. धर्मामध्ये प्रीती वाढती म्हणजे धर्माचे स्वामी जे अरिहंतादि पंचपरमेष्ठी त्यांच्या गुणांमध्ये अनुराग किंवा भक्ती वाढते. ही भक्ती इकी शुद्ध असते की ह्यात कपट, मिथ्याज्ञान, भोगाची इच्छा नसल्याने ती मेरू सारखी निष्कंप असते. अशी भक्ति धर्मात्म्याच्या वैयावृत्याने होते. पंचमहाव्रतयुक्त, कषायरहित, रागद्वेषाला जिंकणारे, श्रुतज्ञानरू पी रत्नाचे भांडार अशा उत्तम पात्राचा लाभ वैयावृत्य करणाऱ्यालाच होतो. ज्याने रत्नत्रय धारण करणाऱ्याचे वैयावृत्य केले त्याने रत्नत्रयाशी आपली गाठ बांधून आपल्याला आणि इतरांना मोक्षमार्गामध्ये स्थापन केले.

वैयावृत्य हे अंतरंग आणि बहिरंग अशा दोन्ही तपामध्येप्रधान असून कर्माची निर्जरा करण्याचे मुख्य कारण आहे. ज्याने आचार्यांचे वैयावृत्य केले., त्याने सगळ्या संघाचे आणि धर्माचे वैयावृत्य केले( त्याने स्वत:चे आणि इतरांचे संयमरक्षण केले( त्याने शुभध्यानाची वृद्धी केली( त्याने इंद्रियनिग्रह केला( त्याने रत्नत्रयाच रक्षण केले( त्याने अतिशय दान दिले( त्याने निर्विचिकित्सगुण प्रगट दाखविला आणि त्याने जिनेंद्रधर्माची प्रभावना केली. धन खर्चणे सोपे परंतु आजारी माणसांची शुश्रूषा करणे कठिण आहे. दुसऱ्याचा अवगुण झाकून त्याचा सद्गुण प्रकट करणे हेही वैयावृत्त्य आहे. ह्या सद्गुणांनी तीर्थंकर नामकर्माच्या प्रकृतीचा बंध होतो. वैयावृत्य हे गामध्ये सर्वोत्तम आहे. जे कोणी श्रावक अथवा साधू वैयावृत्य हे जगामध्ये सर्वोत्तम आहे. जे कोणी श्रावक अथवा साधू वैयावृत्य करतात ते सर्वोत्कृष्ट निर्वाणपदाला प्राप्त होतात. जो कोणी आपल्या सामर्थ्याप्रमाणे सहा काय जीवांची रक्षा करण्यामध्ये तत्पर असतो त्याला संपूर्ण प्राणिमात्रांचे वैयावृत्य घडते. अशा नवव्या वैयावृत्य नामक भावनेच वर्ण केले.

## १० अर्हद्भक्ति

मन-वचन-कायेने जिन अशा दोन अक्षराचे स्मरण करणे ही अर्हद्भक्ति आहे. अर्हंताच्या गुणामध्ये जो अनुराग ती अरहंतभक्ति होय. ज्याने पूर्वजन्मी षोडशकारण भावनांच चिंतन केले आहे तो तीर्थंकर होऊन

अरहंत होतो. त्यांच्या षोडशकारम भावनेपासून उत्पन्न झालेल्या अद्‌भुत पुण्यान तो गर्भात येण्याच्या आधी सहा महिने इंद्राच्या आज्ञेने कुबेर बारा योजने लांब आणि नऊ योजने रूं द अशी रत्नमयी नगरी निर्माण करतो. तिच्या मध्यभागी राजाच्या राहण्याच्या महालाची रचन व नगरीची रचना तसेच रत्नमयी कोट, परकोट, खंदक इत्यादिक रचना कुबेराने केलेली असते. त्याचे वर्ण करण्यास कोणीही समर्थ नाही. तेथे तीर्थंकराच्या मातेच्या गर्भाचे शोध करण्यासाठी आणि मातेची सेवा करण्यासाठी रुचक द्वीपामध्ये राहणाऱ्या छप्पन्न कुमारिका देवी येऊन राहतात. तेथे तीर्थकर गर्भात येण्याच्या आधी सहा महिन्यापासून सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी आकाशातून साडेतीन कोटि रत्नांची वृष्टी कुबेर करीत असतो.

प्रभू गर्भात आल्यानंतर इंद्रादक चार प्रकारच्या देवांचे आसन कंपायमान होते. त्यामुळे ते येऊन नगराला प्रदक्षिणा देतात व प्रभूच्या मातापित्यांची पूजा सत्कारादिक करू न आपापल्या जागी जातात. तीर्थंकर भगवान् हे स्फटिकमण्याच्या पेटीसारख्या व मलमूत्रांनी रहित अशा मातेच्या गर्भामध्ये राहतात. त्यावेळी कमलात राहणाऱ्या छप्पन्न देवी व आणखीही कित्येक देवी मातेची सेवा करीत असतात. पुढे नऊ महिने पूर्ण झाल्यावर योग्य वेळी तीर्थंकराचा जन्म होतो. त्यावेळी चार प्रकारच्या देवांचे आसन कंपायमान होते आणि अकस्मात् वाद्ये वाजू लागतात. त्या योगाने तीर्थकराचा जन्म झाला असे अवधिज्ञानाने देवांस समजते( त्यावेळी सौधर्मस्वर्गातील इंद्र, एक योजन प्रमाणे ऐरावत हत्तीवर बसून आपल्या सौधर्मस्वर्गातील एकतिसाव्या पटलातील अठराव्या श्रेणीबद्ध नावाच्या विमानातून असंख्यात देव, चाकर, नौकर परिवारासह साडेबारा कोटि जातींच्या वाद्याचा सुस्वर ध्वनी करीत तेथे येतात. त्याचबरोबर असंख्यात देव जयजयकार शब्द उच्चारीत अनेक ध्वजा आणि उत्सवाची सामग्री घेऊन येतात. त्याचबरोबर कोट्यावधि अप्सरा नृत्य करीत व कोट्यावधी गंधर्व देव गायन करीत येतात.

नंतर इंद्र नगरला प्रदक्षिणा देऊन ऐरावत हत्तीवर प्रसूतिगृहाबाहेर उभा राहतो. आणि त्याची इंद्राणी मातेच्या प्रसूतिगृहात जाते. मातेला मायानिद्रा घालून बाळाचे वियोगदुःख होऊ नये म्हणून आपल्या देवत्वशक्तीने दुसरे मायामयी बालक मातेजवळ ठेवते, नंतर तीर्थंकराला मोठ्या भक्तीने उचलून घऊन इंद्राच्या स्वाधीन करते. त्यावेळी इंद्र तीर्थंकराच्या स्वरू पाकडे एकसारखा पाहू लागतो, परंतु त्याची तृप्ती होत नाही म्हणून तो हजार डोळेकरू न पाहू लागतो. ह्या समारंभाच्या वेळी ईशानादिक स्वर्गाचे इंद्र आणि भवनवासी, व्यंतरवासी, ज्योतिषवासी, इंद्रादिक असंख्यात देव आपापल्या सेना, वाहने, परिवार घेऊन तेथे येतात. सौधर्मइंद्र ऐरावत हत्तीवर ओटीत तीर्थंकराला घेऊन बसला आहे, इशान इंद्रान वरती छत्र धरले आहे, नसत्कुार माहेंद्र चौऱ्या वारीत आहेत आणि इतर असंख्यात देव आपापल्या कामगिरीमध्ये तप्तर आहेत, अशा थाटाने प्रभूला मेरू पर्वताकडे नेऊन, पांडुकवनामध्ये पांडुकशिलेवर अकृत्रिम सिंहासनावर स्थापन करतात. नंतर पांडुकवानापासून क्षीरसमुद्रापर्यंत दोन्ही बाजूंनी देव ओळीने उभे राहतात. हा क्षीरसमुद्र मेरू च्या जमिनीपासून पाच कोटीदहा लाख साडे एकोणपन्नस हजार योजन दूर आहे. मेरू च्या चूलिकेपासून तेथपर्यंत

मुकुट, कुंडल, हार, कंकणादि अद्भुत रत्नांचे दागिने परिधान केलेले देव दोन्ही बाजूंनी ओळीने उभे राहतात आणि क्षीरसमुद्रातील पाण्याने एक हजार आठ कलश भरून हातोहात मेरु पर्यंत आणतात. तेथे दोन्ही बाजूंच्या इंद्रांना उभे राहण्यासाठी दुसरी लहान सिंहासन असतात. त्यावर सौधर्म इंद्र आणि ईशान इंद्र हे एक हजार आठ कळस घेऊन तीर्थंकर बाळाचा अभिषेक करतात. त्या कळसाचे मुख एक योजन रुंद, पोट चार योजन रुंद आणि आठ योजन उंच असते. अशा कळसातून पडलेली धार तीर्थंकराच्या वज्रमयी शरीरावर पडते, तथापि ती भगवंताला पुष्पांच्या वृष्टीप्रमाणे हलकी वाटते. नंतर इंद्राणी अत्यंत मृदु वस्त्राने प्रभूचे शरीर पुसते व स्वर्गाहून आणलेली रत्नमयी आभूषणे घालून आपला जन्म सफल झाला असे मानू लागते. यानंतर मेरू पर्वतावरून प्रभू आणून मातेजवळ ठेवतात. त्यावेळी तेथे तांडवनृत्य वगैरे जो उत्सव देव करतात त्या सगळ्यांचे वर्ण करणे अशक्य आहे.

जन्मत: तीर्थंकर प्रकृतीच्या उदयाने दहा अतिशय प्राप्त होतात. १) शरीराला घाम न येणे, २) मल, मूत्र व श्लेष्मरहित शरीर, ३) शरीरातील रक्त दुधासारखे, ४) समचतुरस्त्रसंस्थान, ५) वज्रर्षभनाराचसंहनन, ६) अत्यंत सुंदर स्वरूप, ७) महासुगंधित शरीर, ८) अप्रमाण बळ, ९) एक हजार आठ लक्षणे, १०) आणि प्रियहित मधुर भाषण. प्रभूच्या आंगठ्यामध्ये इंद्राने अमृत स्थापन केले असल्यामुळे मातेच्या स्तनाचे दूध ते पीत नाहीत. प्रभूच्या वयाप्रमाणेच देव आपले शरीर बनवून प्रभूपाशी राहतात. त्या देवकुमारांशी क्रीडा करीत प्रभू मोठे होतात. प्रभूसाठी मनोवांछित भोजनपान, वस्त्र, अलंकार हेस्वर्गाहून देव घेऊन येतात. भगवंत पृथ्वीवरील लोकांचे भोजन, आभरण, वस्त्रादिक अंगीकार करीत नाहीत.

बाळपण संपवून तारुण्यात पित्यांनी दिलेले राज्य भोगतात त्यांना संसार भोगापासून विरक्तता उत्पन्न होते तेव्हा ते अनित्यादिक वारा अनुप्रेक्षांचे चिंतन करतात. त्यावेळी ब्रह्मस्वर्गाहून लौकांतिक देव येऊन प्रभूची स्तुती करतात. त्यावेळी चार प्रकारच्या इंद्रादिक देवांचे आसन कंपायमान होते. त्यावरून अवधिज्ञानाने जिनेंद्राला वैराग्य झाल्याचे त्यांना समजते. ते तेथे येतात आणि प्रभूना अभिषेक करून व त्यांना देवलोकांच्या वस्त्राभरणांनी भूषित करून रत्नमयी पालखीतून मोठ्या उत्सवाने जयजयकार शब्द करीत तपोवनात नेतात. तेथे प्रभू आपल्या अंगावरील सगळी वस्त्राभरणे काढून टाकतात. नंतर सिद्धाला नमस्कार करून आपले केश पंचमुष्टींनी उपटून टाकतात. ते केश इंद्र रत्नाच्या पात्रातून क्षीरसमुद्रात नेऊन टाकतात. याप्रमाणे दीक्षा घेतल्यानंतर काही वर्षांनी तपश्चरणाच्या प्रभावाने आणि शुक्लध्यानाच्या प्रभावाने क्षपक-श्रेणी मांडून घाति-कर्माचा नाश करतात, त्यायोगाने प्रभूला केवलज्ञान उत्पन्न होते. त्यावेळी त्यास अर्हंतपणा प्रकट होतो. मग केवलज्ञानरूपी नेत्रांनी भूत, भविष्य वर्तमान अशी त्रिकालवर्ती समस्त पदार्थांना अनंतानंत पर्यायांनी सहित एके समयात युगपत पाहतात व जाणतात.

त्यावेळी चार प्रकारचे देव प्रभूच्या ज्ञानकल्याणकाची पूजा करतात व प्रभूच्या उपदशासाठ समवसरण रचतात. ते पृथ्वीपासून पाच हजार धनुष्य उंच असते. तेथे इंद्रनील रत्नाच्या बारा योजन गोल भूमीवर समवसरण रचिले जाते. तेथ समवसरणाची रचना होते आणि भगवंताचा विहार होतो. तेथे आंधळ्याला दिसू लागते, बहिऱ्याला ऐकू येते, पांगळे चालू लागतात व मुके बोलू लागतात. हेसगळे वीतरागपणाचे अद्‌भुत माहात्म्य आहे. समवसरणरचनेत धूलिशालादिक

१. दोन मुष्टींनी मस्तकावरील केस उपटणे, दोन मुष्टींनी दोन्ही मिशांचे केस उपटणे व एक मुष्टीने दाढीचे केसउपटणे याला पंचमुष्टि लोच म्हणतात.

रत्नमयी कोट, मानस्तंभ, पाण्याचाखंदक, फुलांचा बगीचा( पुन:रत्नमयी कोट, दरवाजे, नाट्यशाला,उपवद, वेदा, ध्वाजाभूमी( पुन: कोट,र पुन: कल्पवृक्षांचे वन, रत्नमय स्तूप, प्रसाद प्रदेश नंतर स्फटिकाच्या कोटात देवछंद नांवाचा एक योजनाचा मंडप, सर्व बाजूंनी बारा सभा, त्यापुढे रत्नमयी तीन कटणीवरील गंधकुटीच्या सिंहासनावर चार बोटे अधर अर्हंत भगवान् विराजमान होतात. त्यांची अनंतज्ञान, अनंतदर्शन, अनंतवीर्य, अनंतसुखमयी अंतरंग विभूतीची महिमा वर्णन करण्यात चा ज्ञानाचे धारक असे गणधर देखील समर्थ नाहीत. तेव्हा दुसऱ्या कडून ती कशी होणार( समवसरणाची विभूती वचन अगोचर आहे. गंधकुटी तिसऱ्या कटणीवर आहे. तेथे प्रत्येक बाजूला बत्तीस असे दोनही बाजूला चौसष्ट इंद्र मुकुट, कुंडल, हार, बाजुबंध, कडी, वगैरे संपूर्ण अलंकार घालून चौरष्ट चामर हातात धरून भगवंतावर वारीत असतात. भगवंताच्या मस्तकावर तीन छत्रे असतात, ती सूर्य-चंद्रापेक्षाही अधिक दैदीप्यमान भासतात. भगवंतावर शरीराच्या कांतीचा इतका प्रकाश असतो की, समवसरणात रात्र आणि दिवस ह्यांचा भेदच दिसत नाही. नेहमी दिवसच दिसतो. भगवंताचे शरीर इतके सुगंधित असते की, तसा सगंध त्रैलोक्यात दुसरा नाही. गंधकुटीवर देवांनी रचिलेला अशोकवृक्ष पाहताच, तेथील जीवाचा शोक नाहीसा होतो. कल्पवृक्षाच्या पुष्पांची वृष्टी आकाशातून होत असते. आकाशात साडेबारा कोटि जातीच्या वाद्यांचे असे मधुर ध्वनी निघतात, की, ते ऐकताक्षणी तहानभूक तर काय पण सर्व रोगाच्या वेदनाही नाहीशा होतात. त्यांचे रत्नजडित सिंहासन सूर्याच्या कांतीला मागे टाकते. भगवंताच्या दिव्यध्वनीचा अद्‌भुत महिमा आहे. तो त्रैलोक्यातील प्राणिमात्रावर दया करून मोहरूपी अंधकाराचा नाश करतो. सगळे प्राणी आपआपल्या भाषेत त्याचा अर्थ ग्रहण करतात. सर्वांचा संशय नाहीसा होतो. तो स्वर्गमोक्षाच्या मार्गाला प्रकट करणारा आहे. दिव्यध्वनीचे माहात्म्य वचनाद्वारे सांगण्याला गणधरइंद्रादिक समर्थ नाहीत.

समवसरणामध्ये जातिविरोध प्राण्यांमध्ये देखील वैर राहात नाही. समवसरणात सिंह आण हित्ती, वाघ आणि गाय, मांजर आणि उंदिर इत्यादिक जीव परस्परातील वैर सोडून मित्रभाव धारण करतात. हा वीतरागपणाचा अद्‌भुत महिमा आहे. ज्यांच्या सान्निध्यामुळे देवांनी रचलेले कलश, झारी, दर्पण, ध्वजा,

स्थापना, छत्र, चामर आणि पंखा हे अचेतन पदार्थ देखील लोकामध्ये मंगलपणाला प्राप्त झाले आहेत. केवलज्ञान झाल्यानंतर प्रभूला दहा अतिशय प्रगट होताततेे असे ज्ञ १) चोहोकडे शंभर योजनपर्यंत सुभिक्षता, २) जमिनीला स्पर्श न करता आकाशातून गमन करणे, ३) कोणत्याही प्राण्याचा वध न होणे, ४) भोजनाचा अभाव, ५) उपसर्गाच्या अभाव,६) चतुर्मुख दिसणे, ७) संपूर्ण विद्येचे ईश्वरत्व, ८) छाया न पडणे, ९) डोळ्याच्या पापण्या न लवणे, १०) नख व केश न वाढणे, असे दहा अतिशय घातिकर्माचा नाश झाल्याने आपोआप प्रकट होतात.

ह्यावेळीस्वर्गीय देव चौदा अतिशय दाखवितात ते असे - १) अर्धमागधी भाषा, २) सर्व प्राणिसमूहात मैत्रईभाव, ३) सगळ्या ऋतूतील फळे, फुले यांनी वृक्ष फलणे, ४) पृथ्वी दर्पणासारखी स्वच्छ तृण-कंटक-रजरहित रत्नमयी होणे, ५) थंड, मंद सुगंध असा वारा वाहणे, ६) सर्व लोकांना आनंद वाटणे, ७) अनुकूल दिशेने वायू वाहणे, ८) सुगंधी पाण्याच्या वृष्टीने जमिनीवरची धूळ नाहीशी होणे, ९) प्रभू जे पाय ठेवतील तेथे सात कमले मागे, सात कमले पुढे, निर्मळ, १२) चार प्रकारच्या देवांनी केलेला जयजयकार शब्द, १३) सूर्यापेक्षाही अधिक चकाकणारे एक हजार अरे असलेले धर्मचक्र भगवंताच्या गमनप्रसंगी पुढे असणे, आणि १४) आठ मंगल द्रव्ये हे चौदा देवकृत अतिशय प्रकट होतात. क्षुधा, तृषा, जन्म, मरण, जरा, रोग, शोक, भय, विस्मय, राग, द्वेष मोह, अरति, चिंता, स्वेद, खेद, मद आणि निद्रा अशा अठरा दोषांनी रहित असलेल्या अरिहंत परमेष्ठीला नमस्कार करा, त्यांचे स्तवन करा. आणि ध्यान करा. ही भक्ती संसारसमुद्रातून तारणारी आहे. हिचे निरतर चिंतन करा. अरहंताची नांवे गुणांच्या आश्रयाने अनंत आहेत. इंद्राने भक्तिवश भगवंताचे एक हजार आठ नांवांनी स्तवन केले आहे. ज्यांना तसे सामर्थ्य नाही त्यांनी आपल्या शक्तीप्रमाणे पूजन, स्तवन, नमस्कार व ध्यान करावे. सम्यग्दर्शन आणि अरिहंतभक्ति ह्यात नामभेद आहे, अर्थभे नाही, अरहंतभक्ति नरकादिकांचा नाश करणारी आहे. जे कोणी अर्हदभक्तीचे पूजन व स्तवन करून अर्ध्य उत्तारण करतात ते देवाचे सुख भोगतात. शेवटी मनुष्यगतीतील उत्तम सुख भोगून अविनाशी अक्षय सुख प्राप्त करून घेतात. ह्याप्रमाणे अरिहंतभक्ति नांवाच्या दहाव्या भावनेचे वर्ण केले.

## ११ आचार्यभक्ति

ज्यांना वीतराग गुरूंच्या गुणामध्ये प्रेम वाटते ते धन्य होत आणि ती गुरुभक्ति होय. जे गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानतात ते भाग्यवान समजावेत. आचार्य हे अनेक गुणांची खाण आहेत. ते उत्कृष्ट तपश्चरणाचे धारक आहेत म्हणून त्यांचे गुण मनामध्ये धारण करून पूजा करावी, अर्ध्य द्यावे, अग्रभावी पुष्पांजलि करावी आणि वारंवार अशा गुरूच्या चरणांची सेवा घडो असे मनात वागवावे. आचार्य हे अनशनादिक बारा प्रकारच्या तपामध्ये निरंतर तत्पर असतात. तसेच सहा आवश्यक क्रियांमध्ये सावधान असतात( पंचाचार पाळतात, दशाक्षणिक धर्म व तीन गुप्ति धारण करून मन, वचन कायेचा निग्रह करतात.

पंचाचार म्हणजे १) सम्यग्दर्शनाचार, २) सम्यग्ज्ञानाचार, ३) सम्यक्चारित्राचार, ४) तपाचार आणि ५) वीर्याचार. ह्या पाच प्रकाराच्या आचारांचे पालन करण्यात ते तत्पर असतात. ते अंतरंग वहिरंग परिग्रह ठेवीत नाहीत. एक उपोषण, दोन उपोषणे, तीन उपोषणे, पंचोपवास, मासोपवास करतात. निर्जन वनामध्ये, पर्वताच्या दऱ्यातव गुहेत राहून निश्चल

टीप - १. आठ दिशांची चौदा मिळून ११२ व त्याचे अंतराळी ११२ व पायाखालचे १ मिळून २२५ कमले होतात.

ध्यान करतात. शिष्याची योग्यता चांगल्या प्रकारे जाणून त्यास दीक्षा देतात. नैगमादि नऊ प्रकारच्या नयांचे त्यांना चांगले ज्ञान असते. ते आपल्या शरीरावर ममत्व करीत नाहीत. संसाररूपी आडा पडल्याने त्यांना भय वाटते मन, वचन, काया शुद्ध करून नाकाच्या अग्रभागी दोन्ही डळ्यांची दृष्टी ठेवून एकाग्र ध्यान धरतात. आ आचार्याला आपली सर्व अंगे नमवून वंदना करावी व त्यांच्या चरणकमलांची अष्टद्रव्यांनी पूजा करावी. ही आचार्यभक्ति आहे. ह्यापासून संसारपरिभ्रमणाची पीडा नाहीशी होते.

आचार्य हे संपूर्ण धर्माचे नायक आहेत. ते राजकुलात, मंत्रिकुलात अथवा वैश्यकुलात जन्मलेले असावेत, सुस्वरूप असावेत. त्यांचे स्वरूप पाहताच मन शांत व्हावेत. त्यांचे उच्च आचरण जगात प्रसिद्ध असले पाहिजे. गृहस्थाश्रमात निंद्य आचरण व निंद्य व्यवहार त्यांनी केलेला नसावा. ते हल्लीची भोग व संपदा सोडून विरक्त झालेले असावेत( लौकिक व्यवहार आणि परमार्थाचे जाणते असावेत( तीव्र बुद्धीचे असावेत, तपस्वी असावेत. जे तपश्चरण अन्य मुनीश्वर करू शकत नाहीत असे कठिण तपश्चरण करणारे असावेत, दीक्षा घेऊन पुष्कळ दिवस गेले असावेत व पुष्कळ दिवसपर्यंत गुरूंची चरणसेवा केलेले असावेत. त्यांच्या वचनश्रवणाने श्रोत्यांची धर्मामध्ये दृढता व्हावी, संशय नाहीसे व्हावेत व संसारदेहभोगापासून विरक्तता व्हावी. याशिवाय सिद्धांतसूत्राच्या अर्थाला पूर्ण जाणते असावेत, इंद्रियांचे दमन करून इहलोक आणि परलोक संबंधी भोगविलासाची इच्छा सोडलेले असावेत, देहावर ममत्व सोडून मोठ्या धैर्याने उपसर्ग व परीषह सहन करणारे असावेत. आचार्यच आपल्या चरित्रापासून चलायमान झाले तर सगळा संघ भ्रष्ट होऊन धर्माचा लोप होईल. आचार्य हे स्वमत-परमताचे जाणतेअसावेत. अनेकान्त विद्येमध्ये पारंगत असावेत( दुसऱ्याच्या प्रश्नाला न घाबरता तत्काळ उत्तर देणारे असावेत. एकान्त पक्षाचे उद्यमी असावेत, गुरूपाशी प्रायश्चित्तादिक सूत्रे शिकलेले व छत्तीस गुणांचे धारक असावेत. समस्त संघाच्या साक्षीने गुरु अशाच पुरुषाला आचार्यपद देतात. वरील गुण नसताना आचार्यपद दिल्याने धर्मतीर्थाचा लोप होतो( मिथ्यामार्गाची प्रवृत्ती वाढते, समस्त संघ स्वेच्छाचारी होतो आणि सूत्राची व आचाराची परंपरा नाहीशी होते.

आचार्यपणाचे दुसरे आठ गुण आहेत ते असे - १) आचारवान, २) आधारवान, ३) व्यवहारवान, ४) प्रकर्ता, ५) अपायोपायविदर्शी, ६) अवपीडक, ७) अपरिस्त्रावी आणि ८) निर्यापक. त्यात पाच प्रकारचे आचार

धारण करणाऱ्याला आचारवान म्हमतात. ते पाच प्रकारचे आचार असे - १) जी जीवादिक तत्वे सर्वज्ञ वीतराग प्रभूंनी दिव्य ज्ञानाने पाहून सांगितली त्यावर श्रद्धा असणे हा दर्शनाचार होय. २) स्वपरत्वाला आगम आणि आत्मानुभवान जाणणे हा ज्ञानाचार म्हणावा. ३) हिंसादिक पंच पातकांचा त्याग हा चारित्राचार आहे, ४) अंतरंग बहिरंग तपामध्ये प्रवृत्ती असणे तो तपाचार, आणि ५) परीषहादिक प्राप्त झालेअसता धैर्य ठेवणे हा वीर्याचार होय.

१) पुाच प्रकारचे आचार निर्दोषणे आपण स्वत: पाळून इतर शिष्यारकडून पाळविण्यामद्ये जे उद्यमी असतात तेच आचार्य समजावेत. जे स्वत: हीनाचारी असतात ते शिष्याकडून शुद्ध आचरण करवू शकत नाहीत म्हणून शिष्यही हीनाचारी बनतात. ते स्वत: आहारविहार, उपकरण, वंतिका वगैरेचा विचार शास्त्रानुकूल ठेवीत नाहीत म्हणून शुद्ध उपदेश त्याजकडून होत नाही. ह्यासाठी काटेकोर आचरण करणारे आचार्य असावेत. हा पहिला आचारवान नांवाचा भेद होय.

२) दुसरा भेद आधारवान म्हणून सांगितला तो असा. जो जिनेंद्रानी वर्णन केलेल्या चार अनुयोगांचा जाणता असेल, जो स्याद्वादविद्येचापारगामी असेल, प्रमाण, नय, निक्षेपांनी उत्तम प्रकारे तत्त्वनिर्णय करणारा असेल तो आधारवान आचार्य म्हणावा.

याप्रमाणे ज्याला श्रुताचे उत्तम ज्ञान नाही तो अन्य शिष्यांचा संशय, एकांतरूप हट्ट व मिथ्या आचरण दूर करू शकत नाही. अनंतानंत कालापासून संसारात भ्रमण करणाऱ्या जीवाला अत्यंत दुर्लभ असा मनुष्यजन्म प्राप्त होणे, त्यातही उत्तम देश उत्तम जाती, उत्तम कुल, पूर्व इंद्रिये, दीर्घायुष्य, सत्संगती, यथार्थ श्रद्धान ज्ञान, आचरण अशा उत्तरोत्तर दुर्लभ गोष्टींचा संयोग घडून आला तरी, अल्पज्ञानी गुरूपाशी राहिल्याने सत्यार्थ उपदेश मिळाला नाही तर त्याला यथार्थ स्वरूपाची प्राप्ती होत नाही. तो संशयात घोटाळू लागतो व मोक्षमार्ग अति कठिण असे मानून रत्नत्रयापासून चलायमान होतो. विषयकषायामध्ये गुंतलेल्या मनाला बाजूला काढण्यास असमर्थ होतो. रोगाच्या वेदना आणि घोर उपसर्ग परीषह आल्यावेळी मन चलायमान होते त्यावेळी श्रुताच्या उपदेशाशिवाय मनाला स्थिरता येत नाही. मृत्यूच्या वेळी सल्लेखना करण्याचा प्रसंग असतो त्यावेळी देश, काल, साहाय्य, सामर्थ्य ह्यांचा क्रम समजल्याशिवाय आहारपानाचा त्याग करण्याने परिणाम बिघडतात, आर्तध्यान होऊ लागते, गति बिघडते, धर्मावर अपवाद येतो, ते पाहून इतर मुनीही धर्मामध्ये शिथिल होतात. एकंदरीत मोठा अनर्थ होण्याचा संभव असतो. मनुष्प्राणी आहारावर जगणार आहे, त्याला नेहमी आहाराची इच्छा होते. रोग झाल्याने किंवा आहाराचा त्याग केल्याने दु:ख होते व मग ज्ञानचारित्रात शिथिलता येते व धर्मध्यान सुटते, अशा वेळी गुरु आपल्या उपदशाने त्याची क्षुधा तृषादि वेदना नाहीशा करतात.

उपदेशरू पी अमृत त्याच्यावर शिंपडून, त्याचे क लेश दूर करू न त्याला धर्मध्यानामध्ये स्थिर करतात. उपदेशाच्या आधारावाचून धर्म टिकत नाही, म्हणून आधारवान आचार्य असतील त्यांचाच आश्रय करणे योग्य आहे. जेव्हा कोणी शिष्य वेदनेने पीडित होतो तेव्हा त्याचे हातपाय मस्क दाबणे, त्याच्या अंगावरू न हात फिरविणे, त्याच्याशी गोड बोलणे इत्यादि कृत्यांनी ज्ञानी गुरु त्यांचे दु:ख दूर करतात. पूर्वी ज्या अनेक साधूंनी घोर परीषह सहन करू न आत्मकल्याण करू न घेतले त्यांच्या कथा सांगून व शरीरापासून आत्मा वेगळा आहे असा त्याला बोध देऊन त्याच्या वेदना मिटवितात. त्यावेळी ते म्हणतात. (( हे मुने, दु:खाच्या प्रसंगी धैर्य धारण करा. संसारात तुम्ही आजवर अनेक दु:ख भोगली आहत. म्हणून आता वीतरागपणाचा आश्रय केला तरच दु:खाचा नाश होईल(( याप्रमाणे समजावून त्यास मार्गापासून चलायमान होऊ देत नाहीत म्हणून आधारवान गुरूं चाच आश्रय असणे आवश्यक आहे.

३) तिसरी भेद जो व्यवहारावान म्हणून सांगितला तो असा. तो प्रायश्चित सूत्राचा जाणता असला पाहिजे. यापुढे आचार्य होण्यासारका असेल त्यालाच त्याने प्रायश्चित्तशास्त्र शिकविले पाहिजे. जिनागामाया जाणता असून महान् धैर्यवान व प्रबल बुद्धीचा धारक असेल तो प्रायश्चित देण्यास योग्य असतो. द्रव्य, क्षेत्र, भाव, क्रिया परिणाम, उत्साह, संहनन, पर्याय, दीक्षेचा काल, शास्त्रज्ञान, पुरुषार्थ वगैरे चांगल्या प्रकारे जाणून राग द्वेषरहित होऊन प्रयश्चित्त द्यावे.सारांश-अमु याला अमुक प्रयश्चित्त दिल्याने त्याचे परिणाम सुटतील व दोष नाहीसे होऊन त्याच्या व्रतामध्ये दृढता येईल इत्यादि गोष्टींचे ज्ञान त्यास असले पाहिजे. तसेच आहाराच्या योग्यायोग्यतेचे ज्ञानही त्याला असले पाहिजे. ह्या क्षेत्रात हे प्रायश्चित्त निभेल किंवा नाही, ह्या प्रांतात वात, पित्त, कफ, शीत, उष्णहे कमी आहेत, जास्त आहेत का थोडे आहेत इत्यादि गोष्टींचा विचार करू न प्रायश्चित दिले पाहिजे. हिवाळा, उन्हाळा, पावसाळा व अवसर्पिणी उत्सर्पिणीचा तिसरा, चौथा वा पाचवा काळ पाहून त्या धोरणाने प्रायश्चित्त दिले जावे, त्याची शक्ती कशी आहे, परिणाम कसे आहेत, तपश्चरणामध्ये त्याला उत्साह आहे की नाही, त्याचे संहनन कसे आहे, पुष्कळ दिवसांचा दीक्षित आहे की नवा आहे, स हनशील आहे की घाबरा आहे, तरू ण आहे की म्हतारा आहे, आगमाचा जाणता आहे की अडाणी आहे. पुरु,ार्थी आहे की आळशी आहे, इत्यादिकांचा विचार करू न प्रायश्चित दिले जावे. जो गुरुपाशी प्रायश्चित्तसूत्र शब्दार्थासहित न शिकता दुसऱ्याला प्रायश्चित्त देतो तो संसाररू पी चिखलात फसून, अपकीर्ती करू न घेतो, उन्मार्गाचा उपदेश करू न सम्यग्मार्गाचा नाश करतो आणि मिथ्यादृष्टी होतो. गुरू ज्याला आचार्यपद देतात त्याच्या अंगी पुढील गुण असले पाहिजेत. तो उच्च कुळात जन्मलेला असावा. व्यवहार परमार्थाचा जाणता असावा, त्याने आपल्या मूळ-गुणाला कधीही

अतिचार लावलेला नसावा. चारही अनुयोगांचा पारगामी असावा. धैर्यवान असावा, परीषह सहन करण्यासारखा शक्तिमान असावा, देवादिकांनी केलेल्या उपसर्गापासून सुद्धा चलायमान न होणारा असावा, कर्तृत्वशक्तीचा, वादी प्रतिवादी यास जिंकण्याला समर्थ, विषयापासून अत्यंत विरक्त, पुष्कळ वर्षे, गुरूचे सेवा केलला, सर्व संघाने जाणले असावे. सारांश-मूर्ख वैद्य देश, काल, प्रकृती वगैरे न समजल्यामुळे रोग्याला मारतो, तसा व्यवहारसूत्र न जाणणारा मूर्ख गुरुही संसारात बुडवितो म्हणून आचार्य हा व्यवहारवान असला पाहिजे.

४) आचार्य हा प्रकर्ता गुणयुक्त असला पाहिजे. संघामध्ये कोणी रोगी, वृद्ध, अशक्त व वयानेलहान असून त्याने सन्यासधारण केला असेल त्याच्या सेवेसाठी नेमलेले मुनी वैयावृत्य करीत असतातच, तरी आचार्यही कोणी मुनी अशक्त असल्यास त्याला उठविणे, बसवणे, निजविणे, त्याचे मलमूत्र, थुंकी, पू, रक्त वगैरे काढून टाकणे, ते धुऊन टाकणे, त्यास चांगल्या जागेत बसविणे, धर्मोपदेश देणे, धैर्य ग्रहण करविणे, इत्यादिक वैयावृत्त करतात, ते पाहून समस्त सांतील मुनीह वैयावृत्त करण्यास तयार होतात. त्यावेळी ते विचार करतात की, ((अहो धन्य ह करुणानिधान गुरु( धर्मात्मा पुरुषाविषाविषयी त्याना किती वात्सल्य वाटते ते पहा. आम्ही मात्र काही न †ÃÖê ´Ö®ÖÖŸÖ आणून सगळा संघ वैयावृत्त करण्याला उद्युक्त होतो. जर आचार्यच स्वत:प्रमादी असेल तर सगळा संघही प्रमादी होतो. महणून आचार्यात कुर्तृत्वगुणाची मुख्यता असावी. सगळ्या संघाचे वैयावृत्त करण्याचे ज्याच्या अंगी सामर्थ्य असेल तोच आचार्य होतो. कोणी आचारहीन असेल त्याजकडून शुद्ध आचरण करवितात, कोणी मंदज्ञानी असेल त्याला नीट समजावून चारित्रात स्थिर करतात, कित्येकाला प्रायश्चित देऊन शुद्ध करतात व कोणाला उपदेश देऊन दृढ करतात. धन्य ते आचार्य( त्यांना जे शरण जातात त्यांना ते मोक्षाच्या मार्गाला लावून उद्धार करतात म्हणून आचार्यांच्या ठिकाणी प्रकर्ता नांवाचा गुण प्रधान आहे.

५) अपायोपयविदर्शी नांवाचा पाचवा गुण आचार्याच्या ठिकाणी असला पाहिजे. तो असो- जेव्हा कोणी साधु पुरुष क्षुधा, तृषा, रोग वगैरेच्या वेदनेने पीडित झाल्यान दु:ख करीत असेल अथवा तीव्र रागद्वेषाने संतप्त झाला असेल किंवा लज्जेने, भयाने यथावत् आलोचना करीत नसेल, रत्नत्रय धारण करण्याचा उत्साह न राहिल्याने धर्मामध्ये शिथिल झाला असेल तेव्हा त्याला रत्नत्रयाच्या नाशापासून अपाय कसा होतो आणि रत्नत्रयाच्या रक्षणापासून कल्याण कसे होते हे अशा तऱ्हेने दाखवितात की, त्याने रत्नत्रयाच्या नाशापासून भयभीत व्हावे. रत्नत्रयाचा नाश झाल्याने आपला उद्धार होऊन अनंत सुखाची निश्चित प्राप्ती होणार अशी खात्री होते. अशा

उपदेशाचे सामर्थ्य ज्यांच्या मद्ये असेल तो अपायोपायविदर्शी नांवाच्या गुणाचा धारक आचार्य म्हणावा.

६) आता अवपीडक नांवाचा सहावा गुण सांगतात, कोणी मुनी रत्नत्रय धारण करू न लज्जेने, भयाने, अभिमानाने किंवा गौरवामुळे आपण केलेल्या दोषांची आलोचना यथावत् करीत नसेल त्यास आचार्य मधुर व अंतकरणास पटेल अशा ब्दात सांगतात, ((अहो अत्यंत दुर्लभ अशा रत्नत्रयाचा लाभ तुम्हाला झालेला आहे तो तुम्ही व्रथ दवडू नका, आईबापासारख्या गुरू पाशी आपले दोष सांगण्यामध्ये काय लाज आहे( तुमचे गुरु वात्सल्य गुणाचे धारक आहेत, ते आपल्या शिष्याचे दोष प्रगट करू न शिष्याला आणि धर्माला कलंक लावणार नाही, ह्यासाठी तुम्ही मनात काही शल्य न ठेवता आलोचना करा. ज्यामुळे तुमच्या रत्नत्रयाची शुद्धी आण तपश्चरणाचा निर्वाह होऊ शकेल तसलेच प्रायश्चित द्रव्य, क्षेत्र, काल, भाव पाहून तुम्हाला दिले जाईल, यास्तव तुम्ही भय सोडून आलोचना करा. असे सांगूनही जर तो मायाशल्य सोडीत नाही असे दिसेल तर **Æê ‹êÛúŸÖÖ ÝÖãºþþ“µÖÖ** कडकडीत तपाच्याप्रभावाने जसे तेजस्वी राजाने दटावल्यारोबर अपराधी लालीच खरे सांगू लागतो, तसे तो शिष्यही मायाशल्य टाकून खरे सांगू लागतो. इतक करू नही तो जर खरे सांगत नाही असे आचार्यास वाटले तर त्यावेळी ते तिरस्काराचे शब्द उच्चारू न म्हणतात ((हे मुने, तुम्ही आमच्या संघातून निघून जा. आमच्याशी तुमचे आता काय प्रयोजन आहे( ज्याला आपल्या शरीराचा मळ धुवावा अशी इच्छा आहे. तो प्रवीण वैद्याच्या म्हणण्याप्रमाणे वागेल. तसेच जो रत्नत्रयरू पी परम धर्माचा अतिचार दूर करू न ते निर्मळ करण्याची इच्छा ठेवील तोच गुरू च्या आश्रयाने राहील. तुम्हाला रत्नत्रयाची शुद्धी करणअयाची इच्छा नाही तेव्हा हा मुनीपणा धारण करणे व नग्न राहून क्षुधादिक परीषह सहन करणअयाची विटंबना सोसणे ह्याचा काय उपयोग( संवर आणि निर्जरा कषायाला जिंकण्यापासून होते आणि तुम्ही जर माया कषायाचा त्याग केला नाही तर व्रत, संयम, मौनधारण हे सगळे व्यर्थ आहे. मायाचा ठेवून नग्न राहणे आणि परीषह सहन करणे निरर्थक आहे. कारण तिर्यंचसुद्धा नग्न राहतात. तुम्ही दूरभव्य आहात, तुमचे चांगले होण्याची अजून वेळ आली नाही आम्हाला वंदन करण्यास तुम्ही योग्य नाही, तुमच्या मनात आपला दोष प्रगट झाला तर निंदा होईल व आपला मोठेपणा कमी होईल असे आहे. असे वाटणे हे बंधाला कारण आहे. मुनींनी स्तुतीमध्ये आणि निंदेमध्ये सारखे परिणाम ठेवणे पाहिजेत.(( इत्यादि कठोर शब्द बोलून त्याचा मायाचार नाहीसा करतात. हा आचार्याचा अवपीडक गुण समजावा. अवपीडक आचार्य उपसर्ग परीषह आल्याने पाबरे होत नाहीत. ते बलवान व धैर्यवान अस्लामुळे तो सहन करतात. त्यांचा प्रभावही असा असतो की, त्यांचे वचन कोणी उल्लंघू शकत नाही. त्यांचा प्रतापही असा

असतो की त्यांना पाहिल्याबरोबर दोषधारी साधू थरथर कापू लागतात. त्यांना पाहून मोठमोठे विद्वान नम्र होऊन वंदन करतात. त्यांच्या कीर्तीचा सुगंध इतका पसरतो की त्यांच्या गुणाविषयी उत्कृट प्रेम उत्पन्न होते. त्यांचे वचन दूरदूरच्या देशात प्रमाण मानले जाते. असा हा अवपीडक आचार्य सिंहासारखा निर्भय होत्साता शिष्याचे हित ज्या उपयांनी होईल तशा रीतीने तयाजवर उपकार करीत असत जशी आई आपल्या लेकराच्या हितासठी ते रडत असल तरी जबरीने तयाल दूध पाजते, तसे शिष्याचे हित चिंतणो आचार्यही मायाशल्य ठेवणाऱ्या शिष्याचे दोष बलात्काराने सोडवितात. औषध प्रथम कडू वाटते. परंतु मागाहून ते हितकारक होते. जो जिव्हेने नुसते गोड बोलतो व शिष्याचे दोष सडवीत नाही तो खरा गुरु नवहे ज लाथा मारून का होईना परंतु शिष्याचे दोष दूर करतो तोच अवपीडक गुणाा धारक आचर्य म्हणावा.

७) आता अपरिस्रावी गुण सांगतात. सिष्यआपले दोष गुरुपुढे आलोचना करून सांगतो. ते दोष गुरुंनी प्रकट करू नयेत. जसे तापलेल्या लोखंडाच्या गोळ्यावर शिंपडलेले पाणी पुन: दिसत नाही तसे शिष्याकडून ऐकलेले दोष आचार्यांनी कोणाला समजू देऊ नये. हा अपरिस्रावी नांवाचा गुण आहे. शिष्य विश्वासाने गुरू ला आपले दोष कळवितो पण गुरु शिष्याचे दोष प्रगट करील तर तो गुरु नव्हे. तो अधम विश्वासघाती आहे. कोणी शिष्य आपलं दोष प्रकट झालेले जाणून दु:खी होतो आणि आत्महत्याही करतो किंवा क्रोधवश रत्नत्रयधर्माचा त्याग करतो, अथवा, गुरू चा दुष्टपणा, पाहून, जशी माझी अज्ञा ह्यांनी केली तशी तुमचीही अवज्ञा करतील असे संघाला सांगून अन्य संघामध्ये जातो. ह्या योगाने सगळ्या संघाचा आचार्यावरचा विश्वास उडतो व सगळेच आचार्याचा त्याग करतात. म्हणून अपरिस्रावी गुणाचा धारकच आचार्य बनण्यास योग्य आहे.

८) आता आचार्यांचा निर्यापक नांवाचा आठवा गुण सांगतात. जसा नावाडी नाव हाकताना अनेक अडचणी टाळून आपली नाव पार करतो तसेच जे आचार्य शिष्याला अनेक विघ्नापासून बचावून संसारसमुद्रातून पार करतात ते निर्यापक गुणाचे आचार्य होत.

असे गुण धारण करणाऱ्या आचार्याच्या गुणामध्ये अनुराग असणे ह्यास आचार्यभक्ति म्हणतात. असे आचार्यांच्या गुणांचे स्मरण करून त्यांचे जो स्तवन करतो, त्यास वंदन करतो व अर्घ्य उतरतो तो पापरूप संसाराच्या परंपरेचा नाश करून अक्षय सुखाला पावतो.

## १२ बहुश्रुतभक्ति

आता बहुश्रुतभक्ति नांवाच्या बाराव्या भावनेचे वर्णन करतात. जे अंगपूर्वाचे ज्ञाते, चार अनुयोगांचे पारगामी बनून निरंतर परमागमाचा अभ्यास करितात व शिष्याकडून करवितात ते बहुश्रुत होत. ज्यंचे श्रुतज्ञान हेच दिव्य नेत्र आहेत, जे आपले आणि इतरांचे हित करणयाविषयी प्रवृत्त होतात, जे जिनसिद्धांताला व अन्य एकांत-मताच्या सिद्धांताला विशदपणे जाणतात व जे स्याद्वादरूपी परम विद्येचे दारक ते बहुश्रुत म्हणावेत. त्यांची भक्ती ती बहुश्रुतभक्ति होय. बहुश्रुताचा महिमा वर्णन करण्यास कोण समर्थ आहे( निरंतर ज्ञानदान करणारे असे जे उपाध्याय त्यांची जे विनयसहित भक्ती करतात ते शास्त्ररूपी समुद्राचे पारगामी होतात. जे अंगपूर्व प्रकीर्णक जिनेंद्रदेवांनी वर्णन केले आहे तो समस्त जिनामगम जे स्वत: शिकतात आणि इतरांना शिकवितात ते बहुश्रुत होत. बारा अंगे व चौदा पूर्वांपैकी प्रत्येकात कोणते वर्णन आहे व त्यांची पदे किती आहेत त्याचा तपशील -

१) आचारांगाची अठरा हाजर पदे आहेत व त्यात मुनिधर्माचे वर्णन आहे.

२) सूत्रकृतांगाची छत्तीस हजार पदे आहेत, त्यात जिनेंद्राच्या शास्त्राचे आराधन कसे करावे ह्याविषयी क्रिया सांगितल्या आहेत.

३) स्थानांगाची बेचाळीस हजार पदे आहेत, त्यास सहा द्रव्यांच्या अनेक स्थानांचे वर्णन आहे.

४) समवायांगाची एक लाख चौसष्ट हजार पदे आहेत, त्यात जीवादिक पदार्थांचे द्रव्य, क्षेत्र, काल व भाव ह्यांच्या आश्रयाने वर्णन आहे.

५) व्याख्याप्रज्ञप्ति अंगाची दोन लक्ष अठ्ठावीस हजार पदे आहेत, त्यात जीवाच्या अस्तिनास्ति वगैरे प्रकारानी गणधारांनी वर्णन केलेल्या साठ हजार पदांचे वर्णन आहे.

६) ज्ञातृधर्मकथा अंगाची पाच लक्ष छप्पन हजार पदे आहेत, त्यात गणधरांनी केलेल्या प्रश्नांना अनुसरून जीवादिकांच्या स्वभावाचे वर्णन आहे.

७) उपासकाध्ययन अंगाची अकरा लक्ष सत्तर हजार पदे आहेत, त्यात श्रावकाच्या व्रतशील व आचारादिक क्रियांचे आणि त्यांच्या मंत्रांचे वर्णन आहे.

८) अंतकृद्दशांगाची तेवीस लक्ष अठ्ठावीस हजार पदे आहेत, त्यात एकेक तीर्थकराच्या तीर्थामध्ये दहा दहा उपसर्ग मुनीश्वर सहन करून निर्वाण पावले त्यांचे वर्णन आहे.

९) अनुत्तरोपपादक दशांगाची ब्यण्णव लक्षा चव्वेचाळीस हजार पदे आहेत. त्यात एकेक तीर्थंकराच्या तीर्थामध्ये दहा द हामुनीश्वर भयंकर घोर उपसर्ग सहन करू न देवताकडून पूजिले जाऊन विजयादिक अनुत्तर विमानामध्ये जन्मले याचे वर्णन आहे.

१०) प्रश्नव्याकरण नांवाच्या अंगामध्ये त्र्याण्णव लक्षा सोळा हजार पदे आहेत. त्यात नष्ट, मुष्ट, लाभ, अलाभ, सुख, दु:ख, जदीवित, मरण वगैरे प्रश्नांचे वर्णन आहे.

११) विपाकसूत्रांगाची एक कोटि चौऱ्यांशी लक्षा पदे आहेत, त्यात कर्माचे उदय, उदीरणा व सत्ता ह्यांचे वर्णन आहे.

१२) दृष्टिवाद नांवाचे बारावे अंग आहे, त्याचे पाच भेद आहेत. १) परिकर्म, २) सूत्र, ३) प्रथमानुयोग, ४) पूर्व आणि ५) चूलिका

१) परिकर्माचेही पाच भेद आहेत. १) चंद्रप्रज्ञप्ति, २) सूर्यप्रज्ञप्ति, ३) जंबूद्वीपप्रज्ञप्ति, ४) द्वीपसागर प्रज्ञप्ति आणि ५) व्याख्याप्रज्ञप्ति.

चंद्रप्रज्ञप्तीची सहा लक्षा पाच हजार पदे आहेत, त्याच चंद्राचे आयुष्य, गती, कलेची हानिवृद्धी, देवी, वैभवपरिवार इत्यादि वर्ण आहे.

सूर्यप्रज्ञप्तीची पाच लक्षा तीन हजार पदे आहेत, त्यात सूर्याचे आयुष्य, गती, वैभव वगैरेचे वर्णन आहे.

जंबूद्वीपप्रज्ञप्तीची तीन क्षा पंचवीस हजार पदे आहेत. त्यात जंबूद्वीपासंबंधी क्षेत्र, कुलाचल पर्वत, ऱ्हद (सरोवरे), नदी इत्यादिकांचे निरूपण आहे.

द्वीपसागरप्रज्ञप्तीची बावन लक्षा छत्तीस हजार पदे आहेत, त्यात असंख्यात द्वीप-समुद्रांचे मध्य लोकातील जिवभवनांचे आणि भवनवासी व्यंतर ज्योतिष्क देवांच्या निवासांचे वर्णन आहे.

व्याख्यापआज्ञप्तीची चौऱ्यांशी लक्षा छप्पन हजार पदे आहेत. त्यात जीव-पुद्लादि अरव्याचे निरूपण आहे.